


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक ८७ * नांदेड * गुरूवार, दि. ३ एप्रिल २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## वक्फ बोर्डात गैर मुस्लिमांना प्रवेश नाही, गृहमंत्री अमित शाहांची ग्वाही

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** वक्फ बोर्डवरून विरोधक लोकांमध्ये गैरसमज परसवत असून त्यांच्या मतपेटीसाठी अल्पसंख्यांक समाजाला भीती दाखवत असल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केला. नव्या वक्फ बोर्ड कायद्यानुसार, कोणताही गैर मुस्लिम व्यक्ती याचा सदस्य नसेल. देणगीसाठी देण्यात आलेल्या निधीचा वापर योग्य पद्धतीने होतोय का नाही हे पाहणे वक्फ बोर्डाचे काम असेल. त्यामध्ये इस्लामी धर्माच्या श्रद्धेमध्ये कोणताही हस्तक्षेप करण्याची सरकारची इच्छा नसल्याचं अमित शाहांनी स्पष्ट केलं.

पुढे बोलताना अमित शाह म्हणाले की, ‘वक्फ’ हा अरबी शब्द आहे, ज्याचा इतिहास काही हदीसशी जोडलेला आहे. आजकाल त्याचा अर्थ धर्मादाय देणगी असा घेतला जातो. वक्फ म्हणजे ‘अल्लाहच्या नावाने पवित्र संपत्तीचे दान’. हा शब्द प्रथम खलीफा उमरच्या काळात वापरला गेला होता आणि आज समजला तर तो परत घेण्याच्या हेतूशिवाय एखाद्या व्यक्तीने



धार्मिक किंवा सामाजिक कल्याणासाठी दिलेल्या मालमत्तेचे दान आहे. या प्रक्रियेला ‘वक्फ’ म्हणतात. देणगी खूप महत्त्वाची आहे, मात्र ज्या गोष्टी आपल्या स्वत:च्या आहेत त्यातूनच दान करता येते, असे शाह म्हणाले.

कोणीही सरकारी मालमत्ता दान करू शकत नाही किंवा इतर कोणाचीही मालमत्ता दान करू शकत नाही. देशात दिल्ली सल्तनत काळात वक्फ अस्तित्वात आला आणि ब्रिटीशांच्या काळात तो धार्मिक बंदोबस्त कायद्यानुसार चालवला जात होता. नंतर १८९० मध्ये, धम दिाय मालमत्ता कायद्यांतर्गत ही प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर १९१३ मध्ये मुस्लिम वक्फ वैधता कायदा अस्तित्वात आला. १९९५ मध्ये वक्फ न्यायाधिकरण आणि वक्फ बोर्डांची स्थापना करण्यात आली. वक्फ परिषद आणि वक्फ बोर्ड १९९५ पासून अस्तित्वात आला, असे त्यांनी सांगितले.

मुस्लिमांच्या मालमत्तेला किंवा समानतेच्या अधिकारांना हानी पोहोचेल या विरोधी पक्षांच्या आरोपांना उत्तर देताना गृहमंत्री म्हणाले की, वक्फ बोर्ड आणि कौन्सिलची स्थापना १९९५ पासून करण्यात आली होती आणि ही प्रक्रिया केवळ मालमत्तेचे प्रशासन आणि नियमन आणि कोणत्याही धर्माच्या श्रद्धांमध्ये हस्तक्षेप न करण्याशी संबंधित आहे. हा गैरसमज पसरवून त्यांची व्होट बँक तयार व्हावी यासाठी अल्पसंख्याकांना घाबरवले जात आहे, असे अमित शाह म्हणाले.

## जिल्ह्यातील १३६५ ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्यत्व रद्द

### जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने दणका; जिल्हाधिकारी कर्डिले यांची कारवाई



**तालुकानिहाय रद्द झालेले सदस्यत्व**

नांदेड ४७, अर्धापूर ४२, भोकर ११९, मुदखेड ४३, हदगाव ७८, हिमायतनगर ४७, किनवट ९९, माहूर ५१, धर्माबाद ८६, उमरी १२५, बिलोली ६८, नायगाव ९७, देगलूर १०५, मुखेड १४२, कंधार ८३ व लोहा तालुक्यात १३३ जणांनी जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र वेळेत सादर केले नाही. परिणामी त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात ग्राम पंचायत निवडणूक लढवून त्यात विजय मिळविला. परंतु निवडून आल्यानंतर एका वर्षाचा कालावधी उलटल्यानंतर देखील जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने जिल्ह्यातील तब्बल १ हजार ३६५ ग्राम पंचायत सदस्यांना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दणका दिला आहे.

ग्रामपंचायत निवडणूक लढविताना अर्ज दाखल करून ग्रामपंचायतीमध्ये निवडून आल्यानंतर एक वर्षाच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मात्र निवडून आल्यानंतर प्रमाणपत्र सादर करण्याकडे दुर्लक्ष केले जाते. अनेकदा या संदर्भात सुनावण्या होऊन कारवाई होणे अभिप्रेत आहेत. तसेच दोषी व्यक्तींविरुद्ध कडक कारवाईसुद्धा गरजेची आहे. पण प्रत्यक्षात सुनावण्या होऊन निकाल लागेपर्यंत सदर निवडून आलेल्या सदस्याचा अर्ध्या पेक्षा अधिकचा काळ लोटला जातो.

नांदेड जिल्ह्यातील सुमारे १ हजार १३ ग्राम पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारी २०२१ ला मतदान होऊन १८ जानेवारीला निकाल लागला. तसेच पुढे १० जुलै २०२३ पर्यंत अन्य काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका पार पडल्या. दरम्यान १ जानेवारी २०२१ ते १० जुलै २०२३ या कालावधीत पार पडलेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोटनिवडणुकीत राखीव जागेवर निवडून आलेल्या संबंधित सरपंच आणि सदस्यांना मुदतीत जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करावयाचे होते. मात्र ते सादर न केल्यामुळे अपात्र करण्यासाठी यापूर्वी दोन सुनावण्या झाल्या होत्या.

या निवडणुका राखीव जागेवर निवडून आलेल्या सदस्यांनी मुदतीत जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे अपेक्षित होते. परंतु अनेकांनी तसे केले नाही. अशा सदस्यांची संख्या सुरुवातीला १ हजार ७८० एवढी होती. परंतु आक्षेपानंतर काही प्रकरणी सुनावण्या होऊन संबंधितांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले. त्यानंतर सुद्धा काही प्रकरणे अंतिम सुनावणी अभावी प्रलंबित होती. शिल्लक राहिलेल्या आक्षेपांपैकी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले.

## भूकंपाच्या धक्क्यांनी जपान हादरले

**टोकिओ (वृत्तसंस्था)–** गेल्या काही दिवसांपूर्वी मन्यानमारमध्ये प्रचंड मोठा भूकंप झाला होता. ज्यामध्ये हजारो लोकांना आपले प्राण गमावावे लागले आहे. अशात आता जपानमध्येही भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले आहेत. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ६.० इतकी होती. जपानच्या क्युशू राज्यात भारतीय वेळेनुसार बुधवारी संध्याकाळी ७:३४ वाजता भूकंपाचे धक्के नोंदवण्यात आले. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजी (एनसीएस) नुसार, या भूकंपाचे केंद्र क्यूशू बेटावर होते.

या भूकंपामुळे जपानमध्ये अद्याप कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही, परंतु लोक घाबरून घराबाहेर पडले आहेत. जपानमध्ये भूकंप ही नवीन गोष्ट नाही, हा देश भूकंपांच्या बाबतीत संवेदनशील मानला जातो. पण काळानुसार येथील सरकारने अशा व्यवस्था केल्या आहेत की भूकंपानंतरही जास्त नुकसान होण्याची शक्यता कमी असते. भूकंपानंतर जपान हवामान संस्थेने अद्याप त्सुनामीचा इशारा दिलेला नाही, परंतु अद्याप कोणतेही मोठे नुकसान किंवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. क्यूशू हे जपानमधील तिसरे सर्वात मोठे बेट आहे आणि भूकंपप्रवण क्षेत्र म्हणून ओळखले जाते. स्थानिक प्रशासनाने रहिवाशांना सतर्क राहण्याचा आणि संभाव्य भूकंपांसाठी तयार राहण्याचा सल्ला दिला आहे.

दरम्यान काही दिवसांपूर्वी म्यानमारमध्ये झालेल्या विनाशकारी भूकंपात २७०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून, हजारो लोक जखमी झाले आहेत.

## राज्याच्या दक्षिणेकडे तीव्र वादळी वारे, संपूर्ण राज्यात आज पावसाचा इशारा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** येत्या दोन ते तीन दिवसात अवकाळी पावसाचा इशारा कायम असून हवामान विभागाने संपूर्ण महाराष्ट्रात पावसाचे तीव्र इशारा दिले आहेत.

गेल्या दोन दिवसांपासून महाराष्ट्रात अवकाळी पाऊस आणि गारपीटीची हजेरी लागली आहे. वाढत्या तापमानात आलेल्या पावसामुळे दिलासादायक वातावरण झालं आहे.

आज पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, धाराशिव, लातूर, बीड, अहिल्यानगर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून कोकण विदर्भ



व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना येलो अलर्ट आहे. येत्या दोन दिवसांत अवकाळी पावसाची शक्यता कायम असून गारपीटीची ही शक्यता आहे. दरम्यान राज्यात बहुतांश ठिकाणी तापमान कमी झाले असून नागरिकांना उन्हाच्या झळांपासून दिलासा मिळाला आहे. मात्र अनेक भागात वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी लागल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. शेतकऱ्यांचेही नुकसान झाले आहे.

पुणे हवामान विभागाचे प्रमुख के. एस. कुसाळकर यांनी येत्या चार ते पाच दिवसांत वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपिटीचा अंदाज दिला. राज्याच्या दक्षिणेकडे तीव्र वादळ आले असून आज राज्यात अवकाळी पावसाची तीव्रता अधिक राहण्याची शक्यता आहे.

## ग्राहकांना शॉक! लाईट बिल कमी येणार नाहीच

### वीज दरकपातीच्या निर्णयाला आयोगाकडून स्थगिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नवीन वीज दर आदेशावर तात्पुरती स्थगिती दिली आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडच्या विनंतीनुसार महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने जाहीर केलेल्या वीज दर आदेशाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. हा आदेश १ एप्रिल २०२५ पासून नव्या दरकपातीचा निर्णय लागू होणार होता, परंतु त्यामध्ये काही स्पष्ट चुका असल्याचे महावितरणने निदर्शनास आणले आहे.

महावितरणच्या वकिलांनी सांगितले की, या वीज दर आदेशातील चुका आणि विसंगती या वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या पाच वर्षांच्या नियामक कालावधीतील वीज दराच्या मूळ स्वरूपावर परिणाम करत आहेत. तसेच, हा दर लागू केल्यास विविध प्रकारच्या ग्राहकांना आणि वीज वितरण क्षेत्रातील इतर संबंधित घटकांना मोठे आणि अपरिवर्तनीय नुकसान होऊ शकते. त्यामुळे या आदेशावर तातडीने स्थगिती द्यावी अशी मागणी महावितरणने केली आहे.

महावितरणच्या वकिलांनी



यासंदर्भात सविस्तर पुनरावलोकन याचिका एप्रिल २०२५ च्या अखेरीस सादर केली जाईल, असे सांगितले. त्या पार्श्वभूमीवर आयोगाने २८ मार्च २०२५ रोजी जाहीर केलेल्या नवीन वीज दर आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली आहे. तसेच, महावितरणची पुनरावलोकन याचिका दाखल होईपर्यंत ३१ मार्च २०२३ रोजी जाहीर झालेला आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी लागू असलेला जुना दरच लागू राहील, असेदेखील आयोगाने स्पष्ट केले आहे.

महावितरणकडून महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल करण्यात आली होती. याचिका दाखल केल्यानंतर एम ईआरसीकडून तात्काळ स्टे ऑर्डर देण्यात आली आहे. महावितरणचा तोटा वाढत नुकसान आणि ग्राहकांचे देखील हित नसल्याचं याचिकेत म्हटलं आहे.

## डीपीला आग लागून चार दुचाकी जळून खाक

### चैतन्यनगर भागातील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील चैतन्यनगर भागात एका महावितरणच्या डीपीला आग लागून त्याखाली पार्क केलेल्या चार दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. फायर ब्रिगेडच्या बंबानी ही आग विझविली. मात्र तोपर्यंत महावितरणचे आणि दुचाकी चालकांचे मोठे नुकसान झाले होते.

दि. २ एप्रिल रोजी दुपारी तीनच्या सुमारास शिव मंदिराजवळ महावितरण कंपनीच्या डीपीला आग लागल्याची माहिती अग्निशमन विभागाला मिळाली. तत्काळ १ वाहन कर्मचाऱ्यांसहित



घटनास्थळाकडे रवाना करण्यात आले. महावितरणच्या डीपीला आग लागून त्याखाली ठेवलेल्या भंगार ४ गाड्यांना आग लागली होती. सदरील ठिकाणी होजरील होजच्या सहाय्याने आगीवरती पाणी मारून आग पूर्णपणे विजवण्यात आली. याठिकाणचे ऑटोमोबाईल्स मालक नामदेव कल्याणकर यांना आगीसंदर्भात विचारणा केली असता सांगितले की, एमएसईबी डीपी स्पार्क होऊन आग लागली होती व त्यावरील ठिणगी पडून खाली ठेवलेल्या चार गाड्या आगीत जळाल्या.

यासोबतच आगीच्या दुसऱ्या घटनेत श्यामनगर दवाखान्यामध्ये एमसीबी बोर्डला लागलेली आग बीसी टाईप फायर एक्सटींग्युशरने विझवण्यात आली.

सदरील आग विझविण्यासाठी अग्निशमन अधिकारी के. एस. दासरे यांच्या मार्गदर्शनाखाली उप अग्निशमन अधिकारी निलेश कांबळे, गायकवाड, साजिद, तोटावार पवळे, कदम यांनी परिश्रम घेतले.

## पैशाच्या वादातून ऊसतोड तरुणाचा खून; मारेकऱ्यास अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** पैशाच्या व्यवहारातून एका ऊसतोड तरुणाचा कत्तीने वार करुन खून केल्याची घटना मंगळवारी दुपारी चिंचोली शिवारात घडली आहे. याप्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चिंचोली ता. लोहा येथे दादाराव आनंदा हंबर्डे (वय २६), रा.पाटोदा ता.नायगाव हा ऊसतोड तरुण आपल्या नातेवाईकाडे गेल्या चार दिवसांपासून आला होता. मंगळवारी दुपारी चिंचोली गावाच्या लगत असलेल्या किशन अडकिणे यांच्या ऊसाच्या शेतात दादाराव हंबर्डे याच्यावर कत्तीने सपासप वार करुन खून करण्यात आला. ही घटना पैशाच्या आर्थिक देवाण-घेवाणीतून झाल्याचे सांगण्यात येते. घटनेची माहिती समजताच पोलीस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, सपोनी चंद्रकांत पवार, फौजदार गजानन गाडेकर व पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन प्रेत शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले. याप्रकरणी दिनेश शिंदे या तरुणास पोलिसांनी मारतळा येथील आठवडी बाजारातून अटक केली आहे.

## नांदेड पोलिसांचे संकेतस्थळ तंत्रज्ञानाने सज्ज -शहाजी उमाप

**किनवट (प्रतिनिधी)–** नांदेड शहर उदयोन्मुख शैक्षणिक हब म्हणून पुढे येत असताना सक्रिय पोलीस दल विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या सुरक्षिततेम ध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. नांदेड पोलिसांचे अद्ययावत संकेतस्थळ नागरिकांना पोलीस विभागासोबत सहज सोप्या पद्धतीने जोडण्याचे काम करेल. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाने सज्ज अशी सुविधा नांदेड पोलीस नागरिकांना उपलब्ध करुन देणार आहे, ही कौतुकाची बाब आहे. त्यातच आपल्याच जिल्ह्यातील किनवट सारख्या दुर्गम भागात कार्यरत सेटट्राईब ह्या आयटी कंपनीने संकेतस्थळाचे अद्ययावतीकरण केले आहे, ही विशेष बाब आहे, असे प्रतिपादन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले.

अत्यल्प वेळेमध्ये नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या संकेतस्थळाचे नुतनीकरण व अद्ययावतीकरण केल्याबद्दल पोलीस अधिक्षक कार्यालयाद्वारे सेटट्राईबचा गौरव



करण्यात आला. त्याप्रसंगी शहाजी उमाप बोलत होते.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुम ार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (गृह) अश्विनी जगताप, सायबर पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण व सायबर पोलीस उपनिरीक्षक मारुती चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडला. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सेटट्राईबला गौरवण्यात आले. सेटट्राईबच्यावतीने शहेबाज खान यांनी सन्मान स्वीकारला.

नांदेड पोलीस दलाचे संकेतस्थळ नुतनीकरण व अद्यावतीकरण करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सेटट्राईब या किनवटस्थित आयटी कंपनीची निवड केली होती. नागपूर हिवाळी अधिवेशन, महिला बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीसह विविध जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्हा परिषदांसाठी सेटट्राईबद्वारे आस्थापित केलेल्या सॉफ्टवेअर व टेक सोल्यूशन्सच्या आधारावर ही निवड करण्यात आली होती. ग्रामीण भागातून कार्यरत असूनही तंत्रज्ञानावर असलेली पकड व किमान वेळेत केलेले दर्जेदार काम सेटट्राईबची निवड सार्थ ठरवतात, अशा शब्दांत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सेटट्राईबचे कौतुक केले. तसेच भविष्यात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व सुविधेसाठी तंत्रज्ञानाचा वापर करताना सेटट्राईब महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नांदेड पोलीस दलासोबत काम करणे, तसेच तंत्रज्ञानधरित सोल्यूशन्स उपलब्ध करुन देणे, ही सेटट्राईबसाठी मोठी उपलब्धी असल्याचे सेटट्राईबचे संचालक सारंग वाकोडीकर म्हणाले. कोरोना काळात सेटट्राईबने सामाजिक बांधिलकीतून महिला सशक्तीकरण, सायबर अवेअरनेस, संवाद ह्यासारख्या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला होता व किनवट उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्यावतीने सेटट्राईबला सन्मानित करण्यात आले होते.

## राख गँगला सुतासारखं सरळ करणार, बीडमध्ये जाऊन अजित पवारांनी भरला दम

**बीड (प्रतिनिधी)–** राज्याची उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार बुधवारी बीड जिल्हा दौऱ्यावरती होते. सकाळीच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस भवनमध्ये कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या व त्यांच्या अडचणी सोडवल्या. तसेच युवा संवाद मेळाव्यातून अजित पवार यांनी राख गँगला सुतासारखं सरळ करणार असल्याचं सांगितलं.

बीडमध्ये सगळ्या गँग आहेत, राखेची गँग, वाळूची गँग या सगळ्या गँग आहेत. इथे या सगळ्या गँग सुतासारख्या सरळ करणार असल्याचं अजित पवार म्हणाले. बीड ही देवदेवतांची भूमी आहे. जनतेची सेवा करण्यासाठीचे बळ देण्याचे देवदेवतांना साकडे आहे. बीडकरांची बदनामी करणाऱ्या गोष्टी आपल्याला थांबवायच्या आहेत, असं अजित पवार म्हणाले. तसेच बीडमध्ये मराठा आणि वंजारी यांच्यात अनेकदा वाद दिसून आले आहेत. यावरही अजित पवारांनी भाष्य केलं आहे. जाती-जातीतील दुरावा आपल्याला संपवायचा आहे, असं अजित पवार यांनी सांगितले. तसेच प्रतिमा स्वच्छ ठेवा, असं आवाहन देखील अजित



पवारांनी कार्यकर्त्यांना केलं.

शेतीत आता एआय तंत्रज्ञानाचा वापर केला गेला पाहिजे. बीडमध्ये तारांगण केले जाणार आहे. विमानतळ जिल्ह्याच्या जवळ असले पाहिजे. टप्प्याटप्याने राज्यातील विमानतळावर नाईट लँडिंग सुरू केले जाणार आहे. स्वामी रामानंद तीर्थ ग्राम ीण रुग्णालयात - अंबाजोगाई येथील सुविधा वाढवण्यात येणार आहेत. पुढे जायचे असेल तर बेरजेचे राजकारत करत करत सर्वसमभाव राजकारण केले पाहजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दारूगोळा सांभाळणारा अल्पसंख्यक होता. समाजात एकोपा राहील असे काम झाले पाहिजे, असं अजित पवार म्हणाले.

### बीड जिल्ह्यात विमानतळ, रेल्वे का आली नाही? अजित पवारांचा सवाल

आजपर्यंत अनेकांनी बीड जिल्ह्याचे नेतृत्व केले. सुदैवाने सध्या राज्याचे अर्थखाते माझ्याकडे आहे. बीडमध्ये एका विमानतळाची गरज आहे. दुर्दैवाने आतापर्यंत ते झालं नाही. बीडला जायचं असेल तर एकतर लातूरला उतरावं लागतं किंवा नांदेड, छत्रपती संभाजीनगरला उतरुन यावं लागतं. जिल्ह्यात विमानतळ असेल तर अधिकारी, मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना यायला सोपं असतं, असे अजित पवार यांनी म्हटले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# राजकीय आराखडा आणि आखाडा

राज्यात नुकत्याच संपलेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाने जनतेच्या अपेक्षांवर पाणी फिरल्याची टीका विरोधकांकडून होत आहे. लोकप्रतिनिधींची निवड ही जनतेच्या ज्वलंत समस्यांवर चर्चा करून उपाय शोधण्यासाठी केली जाते. मात्र, या अधिवेशनात झालेल्या चर्चांचा स्तर पाहता, विधिमंडळ हा लोकशाहीचा सर्वोच्च मंच आहे. मात्र तो राजकीय आखाडा बनला आहे, असे म्हणण्यास जागा आहे. गेल्या काही वर्षांपासून राज्याच्या राजकारणात सातत्याने अस्थिरता पाहायला मिळाली. फोडाफोडीच्या राजकारणामुळे सरकारे येत आणि जात राहिली. २०२४ मध्ये सत्तेवर आलेल्या महायुती सरकारकडून जनतेला स्थैर्याची अपेक्षा होती. परंतु हे सरकार अजूनही दिशा शोधताना दिसत आहे. प्रचंड बहुमत असतानाही सत्ताधाऱ्यांनी विधिमंडळाचे कामकाज सुरळीत पार पाडण्याऐवजी वादंगाच्या भोवऱ्यात अडकवले. आशा होती की, या अधिवेशनात शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, शिक्षणातील अनागोंदी, आरोग्यसेवा आणि पायाभूत सुविधांवरील चर्चांना प्राधान्य दिले जाईल. मात्र, यापैकी कुठल्याही गंभीर विषयावर सखोल चर्चा झाली नाही. त्याऐवजी, औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा, विनोदवीर कुणाल कामरा याच्या वक्तव्यावरून निर्माण झालेला वाद, आणि दिशा सालियन प्रकरण यासारखे विषय चर्चेत राहिले. यामुळे जनतेच्या गरजा बाजूला पडल्या आणि केवळ राजकीय स्टंटबाजी चालली. राज्यातील कृषी क्षेत्र संकटात आहे. सोयाबीन, कापूस, संत्री, कांदा, ऊस आणि आंबा उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नाही. साखर उद्योग अडचणीत आहे. औद्योगिक गुंतवणूक काही प्रमाणात वाढत असली, तरी उत्पादन क्षेत्राचा विकासदर घसरत आहे. बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र होत आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्तेचा अभाव आणि अनागोंदी कारभाराने विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. हे प्रश्न सोडवण्यासाठी संसदीय लोकशाहीत विरोधक सरकारच्या धोरणांवर टीका करतात, आणि सत्ताधारी त्याला उत्तर देऊन समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतात. मात्र, या अधिवेशनात सत्ताधाऱ्यांकडून कामकाज रोखण्याचे प्रकार झाले, जे अभूतपूर्व मानले जातील. अधिवेशनात काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होईल, अशी अपेक्षा होती. राज्यातील पाणीटंचाई, वाढती गरिबी, महागाई, सार्वजनिक आरोग्यसेवा आणि महिला सुरक्षेसारख्या विषयांना प्राधान्य मिळायला हवे होते. मात्र, प्रत्यक्षात या विषयांना गौण स्थान मिळाले आणि विधिमंडळात वादविवादांचे राजकारण चालू राहिले. विधिमंडळात निर्णयप्रक्रियेला चालना देण्यासाठी स्पीकरची भूमिका महत्त्वाची असते. सभागृहात उठणाऱ्या लक्षवेधी सूचना, ठराव आणि चर्चांवर स्पीकरने योग्य नियंत्रण ठेवणे गरजेचे असते. यापुढील अधिवेशनांमध्ये अध्यक्षांनी गांभीर्याने लक्ष घालून विधिमंडळाचा दर्जा सुधारण्यासाठी कठोर भूमिका घ्यावी, ही अपेक्षा आहे. राज्याच्या विकासासाठी विधायक चर्चा आणि परिणामकारक निर्णय होणे अत्यंत गरजेचे आहे. केवळ टोकाचे आरोप-प्रत्यारोप, राजकीय हिशेब चुकते करणे आणि ध्रुवीकरणाच्या राजकारणाला चालना देणे, यामुळे लोकशाहीची मूल्येच धोक्यात येतील. विधिमंडळ हे लोकशाहीचे पवित्र मंदिर आहे. तिथे केवळ राजकीय नेत्याच्या हेव्यादाव्यावर वाद होता कामा नये. राज्याच्या समस्यांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी पुढील अधिवेशनात लोकप्रतिनिधींनी जबाबदारीने काम करावे, हीच जनतेची अपेक्षा आहे.

# राजांचे राजा : छत्रपती शिवाजी महाराज



भारतीय इतिहासात रत्नासारखी व ज्यांचा इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा अशी जी थोर पुरूष होऊन गेली त्यांपैकी छत्रपती शिवाजी महाराज होय. छत्रपती शिवाजी महाराजांचा लढा हा कोणत्याही व्यक्तिगत लाभासाठी नव्हता, तर तो परिवर्तनासाठी होता. हिंदु व मुस्लिम यांच्यातील संघर्ष नव्हता. सर्व मानवी अधिकार नाकारलेल्या जनतेला, प्रजेला सन्मानाने जगता यावे यासाठी स्वराज्यासाठी, लोकशाहीसाठी, समतेसाठी महाराजांचा लढा होता. त्यामुळे रयतेच्या मानसिकतेत बदल करून छत्रपती शिवाजीमहाराजांनीराजकीय,धार्मिक,सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील गुलामगिरी मोडून काढली. समता, बंधुता, न्यायी स्थापित केली. अशा या समता-वादी राजांचा जन्म अर्थात छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी किल्ले शिवनेरीवर सूर्यास्तसमयी एका नवसूर्याचा जन्म झाला. तोच सूर्य म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. त्यांच्या आईचे नाव जिजामाता तर पित्याचे नांव शहाजी राजे भोसले होते.

शिवाजी महाराजांचे बालपण खडतर होते. बालशिवाजी व जिजामाता बंगलुर मुक्कामी असताना शहाजी राजांनी बालशिवाजीच्या शिक्षणाची व्यवस्था केली. मराठी, संस्कृत व फारसी भाषेचे शिक्षण दिले. अश्वरोहण, तलवारबाजी, दांडपट्टा, भालेफेक, कुस्ती इत्यादींचे शिक्षण देण्यात आले. जिजाऊमातेने एखाद्या कुशल बाल मानसशास्त्रज्ञाप्रमाणे शिवरायांचे बालपण घडविले. बालशिवरायावर जिजामातेने बालपणापासूनच स्वराज्य निर्मितीचे धडे दिले. तसेच त्यांना लहान वयातच शूर-विरांच्या गोष्टी सांगितल्या. त्यांना पराक्रम, ज्ञान, चातूर्य, संघटना अशा सद्गुणाचे बाळकडू दिले. त्याचप्रमाणे सर्वांना समान न्याय देणे, स्त्रियांचा आदर करणे, अपराध करणाऱ्यास कठोर शिक्षा देणे. अशा अनेक गोष्टींची शिकवण त्यांनी शिवरायांना दिली. शिवराय जेव्हा मोठ्या मोहिमांवर जात, तेव्हा जिजाऊ स्वत: राज्य कारभारावर लक्ष ठेवत असत. त्यांनी शिवरायांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. आई ही जगातील सर्वात मोठी गुरू आणि योद्धा असते. याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे राष्ट्रमाता, विरमाता, राजमाता माँसाहेब जिजाऊ होय. राष्ट्रमाता जिजाऊंच्या कानावर महान वारकरी संत जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे नाव आलेले होते. उसंत मिळताच त्या स्वत: शिवाजी, सईबाई सोयराबाई, व्यंकोजी व निवडक लोकांना घेऊन महाराजांच्या किर्तनास जात असत. महाराजांचे घणाघती कीर्तन समाजास परिवर्तनाकडे नेत असे. त्यांनी लोकांच्या मनात विचार जागे केले तसेच लोकांना दया, क्षमा, शांती यांची शिकवण देवून समतेचा उपदेश करत असत. त्यामुळे हा सारा परिसर वैदिक परंपरा झुगारून वारकरी धर्म विचारांचा झाला होता.

जिजाऊंनी शिवरायास वारकरी धर्माची परंपरा सांगितली. संत नामदेव महाराजांनी सुरु केलेली वारकऱ्यांची चळवळ देशभर पोहोचली. लोकगावच्या किर्तनात स्वत: तुकाराम महाराजांनी शिवाजी राजास उद्देशुन अनेक अभंगाची रचना केली. शिव तुझे नाव ठेवली पवित्र छत्रपती सूत्र विश्वाचे. वयाच्या केवळ बाराव्याच वर्षी संत तुकाराम महाराजांनी शिवरायास छत्रपती ही पदवी दिली. ह्या छत्रपतीचे स्वराज्य म्हणजे जगातील पहिले लोकशाही राज्य होय. तुकाराम महाराजांच्या किर्तनातून गावोगावचे मावळे पेटून उठायचे.त्यांचे वारकऱ्यांचे धारकरी बनून शिवाजीराजांच्या सैन्यात दाखल होत असत. तथापि, महान वारकरी संत जगद्गुरु संत तुकाराम महाराज व राष्ट्रमाता जिजामाता यांनी शिवरायावर अतिशय उत्तम संस्कार केले. ते दोघे शिवाजी महाराजांचे खरे गुरू आहेत. शिवरायांचे वडील शहाजी राजे महाराज यांनी शिवरायांना वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षीच दिलेली शिवराजमुद्रा स्पष्टपणे विश्ववंदिता असा उल्लेख करते. अर्थात शहाजी राजांनी शिवरायांची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली होती. ती मुद्रा अशी -

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता
शाहसूनौ: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते

प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे वाढत जाणारी आणि साऱ्या विश्वाला वंद्य होणारी अशी शहाजीराजांचा पुत्र शिवाजीराजे यांची राजमुद्रा लोकांच्या कल्याणासाठी आहे असे सांगणारी राजमुद्रा म्हणजे स्वराज्याच्या स्थापनेचा संकेतच होता. त्या काळात राजमुद्रा बहुधा फार्सी भाषेत कोरलेल्या असत, पण शिवरायांची मुद्रा संस्कृत भाषेत होती. विश्वबंधुता, विश्वशांती, विश्सौख्य, विश्वभरभराट, विश्व विकास अशी उदात्त भावना मनी ठेवूनच स्वराज्याची बांधणी केलेली होती. त्यामुळेच आजही जगातील लोकशाहीवादी स्वतंत्र राष्ट्रे आपल्या शासनास अभिमानाने शिवशाहीचे शासन म्हणतात. आजही छत्रपती शिवाजी महाराजांच्या उंचीचे व्यक्तीमत्व जागतिक इतिहासामध्ये सापडत नाही.

राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान व राष्ट्रभक्ती याचे सर्वोच्च नाव म्हणजे शिवाजी महाराज होय. त्याकाळी हिंदुलोक हिंदू विरूद्ध मुस्लिम लोक मुस्लिमाविरुद्ध, हिंदु मुस्लिमांविरूद्ध, मुस्लिम हिंदु विरूद्ध लढत होते. अनेक मराठा सरदार मुस्लिमांच्या पदरी होते. त्यांच्यात होणाऱ्या लढाया जातीसाठी माती खावी अशा नव्हत्या, तर त्या सत्तेसाठी लढाया होत्या. शिवाजी महाराजांचा मोगल, आदिलशाहा यांच्या विरूद्ध राजकीय लढा होता. तो धर्मिक लढा नव्हता. काही इतिहासकारांनी त्यांचा जीवनकाळ म्हणजे सतत मुस्लिमांशी संघर्ष रंगवला मात्र त्यामध्ये काही तथ्य नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण केले. त्यांनी कायद्याचे अधिराज्य स्थापण करून रयतेच्या सर्वांगीण हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजवले. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार हे विज्ञानिष्ठ, स्त्री-पुरूष समतेला पूरक आणि महत्वाचे म्हणजे सामान्यातल्या सामान्य माणसांच्या कल्याणासाठी होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य स्थापण केले. गुणग्राहता व माणसाची अचूक पारख करणे हे शिवाजी महाराजांच्या अंगी असलेले महत्वाचे गुण होते. त्यांनी फक्त कर्तबगार व निष्ठेतला वाव दिला. त्यामुळे त्यांनी कुणालाही वंशपरंपरागत नोकऱ्या दिल्या नाहीत. सर्व जाती जमातीच्या लोकांना शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीच्या उदात्त कार्याला जोडले व सामान्य जनांना त्यागाची शिकवण दिली. त्यासाठी स्वधर्म व स्वराष्ट्राबद्दलच्या कल्पना सर्व सामान्यापर्यंत नेल्या. जीवा महाल, येसाजी कंक, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते, नेताजी पालकर, शिवाजी कावजी, तानाजी मालूसरे, बाजीप्रभू देशपांडे, बहिर्जी नाईक, काजी हैदर, दौलतखान, नूरबेग, सिद्धी मिस्त्री, मदारी मेहत्तर, फिरंगोजी नरसाळे, येलाजी मांग, रायप्पा महार असे अनेक त्यागी माणसे सामान्य कुटूंबातील होती.

छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रत्येक राजकीय खेळी ही प्रजेच्या कल्याणासाठी करताना बऱ्याचदा शिवरायांना मानहानिकारक प्रसंगांना वा तडजोडींना समोर जावे लागले. स्वराज्याचे म्हणजेच रयतेसाठीचे मोठे स्वप्न सत्यात आणण्याकरीता त्यांनी मिर्झा राजे जयसिंगा सोबत १३ जून १६६५ मध्ये पुरंदरचा तह केला. हा तह करतांना बरेच किल्ले सोडावे लागले, तसेच वार्षिक शुल्क देण्याची तयारी दाखवावी लागली. हा तह करण्यामागे रयतेचे दुरगामी कल्याण शिवरायांच्या नजरेसमोर होते. इथे शिवाजी महाराजांनी अन्य समकालीन राजपूत वा अन्य राजांसारखा आततायीपणा वा अवास्तव स्वाभिमान न वापरता मिर्झा राजांना तहाच्या अनेक चर्चांमध्ये अडकवत स्वत:च्या रयतेचे अधिकाधिक भले साधले. राजांनी रयतेच्या भल्यासाठी जे राजकारण केले ते पूर्णपणे सामाजिक भान ठेवून केलेले होते या तहामध्ये सुद्धा राजाने विजय मिळविला होता.

शिवाजी महाराजांचे आपल्या देशावर फार प्रेम होते आणि मानवी सद्गुणाचे तर ते साक्षत प्रतीक होते. छत्रपती शिवाजी महाराजांना खऱ्या आर्थाने जर कोणी महाराष्ट्रात दाखवून दिले असेल, तर ते राष्ट्रपिता महात्मा ज्योतीबा फुले यांनी. छत्रपती शिवरायांना इतके दुर्लक्षितव उपेक्षित केले होते की, त्यांची रायगडावरील समाधी कुठे आहे, हे कुणालाच माहित नव्हते. त्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले यांनी त्यांच्या समाधीचा शोध घेतला. त्या समाधीच्या आसपासची जागा स्वच्छ केली आणि त्या समाधी स्थळाला फुले वाहिली. अभिवादन केले. त्यांची जयंती त्यांनीच सर्वप्रथम सुरु केली. त्यांच्या जीवनावर प्रदीर्घ असा पोवाडा रचून शिवजयंती उत्सव साजरा केला आणि इतिहासाचे उत्खनन केले. छत्रपती शिवाजी महाराजांना कुळवाडी भूषण म्हणून शेतकरी समाजाचा हितचिंतक आणि संरक्षक या रूपात पुढे आणले. तेंव्हापासून आपण सर्व जन मोठ्या उत्साहाने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करतो. छत्रपती शिवाजी महाराज यांनी क्षणभरही विश्रांती न घेता जनहिताची काळजी घेतली. अखंड खटपटीत असतांना महाराज आजारी झाले. ताप येत होता, उपचार झाले; पण इलाज न चालता चैत्र शुद्ध पौर्णिमा दिनांक ३ एप्रिल १६८० मध्ये हा सूर्य मावळला. केवळ त्यांच्या मूर्तीला हार घालून त्यांच्यावर लेख, कथा, कविता लिहून, चित्रपट काढूण आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे खरे अनुयायी होवू शकत नाही. आज छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार केवळ सांगून चालणार नाही तर प्रत्येकाने त्यांचे विचार आत्मसात करून आपल्या जीवनात वाटचाल केली पाहिजे तरच खरे त्यांना अभिवादन ठरेल.

शिवरायांचे आठवावे रूप ।
शिवरायांचा आठवावा प्रताप ।
शिवरायांचा आठवावा साक्षेप भूमंडळी ।।

रयतेचे जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा आज स्मृतीदिन. त्यानिमित्त त्यांना कोटी कोटी प्रणाम.

**-विकास यशवंता कांबळे**
हाळदा, ता. कंधार, जि. नांदेड
मो. ९०९६८०१४३४

# वाहनांवर नियंत्रण आणायला हवे!

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पुणेकरांनी जोरदार वाहनांची खरेदी केल्याचे समोर आले आहे. गुढीाडव्याच्या दिवशी १० हजार १७० वाहनांची खरेदी केली. त्यात ६५१० दुचाकी, २४२४ चारचाकी, ५१७ गुड्स , २८३ रिक्षा, ६८ बस, २३४ टॅक्सी, १३४ अन्य वाहने पुणेकरांनी खरेदी केल्याची नोंद आरटीओत करण्यात आली. मागील वर्षापेक्षा या वर्षी वाहन खरेदीची संख्या तीन हजाराने अधिक आहे.

मागच्या वर्षी याच काळात ७३३६ वाहनांची नोंद झाली होती याचाच अर्थ मागील वर्षी पेक्षा यावर्षी अधिक वाहनांची खरेदी पुणेकरांनी केली. आधीच पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात या दहा हजार वाहनांची भार पडली आहे. केवळ पुणे शहरातच एका दिवशी दहा हजारांपेक्षा अधिक वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई, ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची बाब समोर आली आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे पाच हजार वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे



गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे.

मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे.

वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे. नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे.

पुण्यामुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्यामुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# लोकतत्त्वांशिवाय कलेत सौंदर्य संभवतच नाही -डॉ. साहेब खंदारे



**लातूर:** येथील दयानंद कला महाविद्यालयात महात्मा ज्योतीराव फुले यांच्या साहित्याचा लोकतत्त्वीय अभ्यास या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा शनिवार दि. २९.३.२०२५ रोजी संपन्न झाली. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड हे होते; तर या कार्यशाळेचे बीजभाषक म्हणून अमूर्त संस्कृतीचे जागतिक संशोधक, लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. साहेब खंदारे हे उपस्थित होते. नागपूरच्या नवराष्ट्र दैनिकाचे पत्रकार जयप्रकाश दगडे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले; या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या विद्यापरिषदेचे सदस्य डॉ. नारायण कांबळे,महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, खटउ समन्वयक डॉ.संतोष पाटील हे उपस्थित होते.

प्रारंभी उदघाटक श्री. दगडे यांनी वर्तमान सामाजिक परिस्थिती आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या साहित्य संबंधाने आपली विस्तृत भूमिका मांडली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांनी महात्मा फुले यांच्या साहित्यावर प्रकाश टाकत त्यांच्या साहित्याचा लोकतत्वीय अंगाने अभ्यास होणे ही काळाची गरज आहे.कार्यशाळेला लाभलेला अभूतपूर्व प्रतिसाद पाहून डॉ. गायकवाड समाधान व्यक्त करीत म्हणाले, सध्या परीक्षांचा काळ सुरु असून देखील मोठ्याप्रमाणात सहभाग नोंदविला त्या बद्दल सर्वांचे स्वागत करुन आभार व्यक्त केले. डॉ. साहेब खंदारे यांच्या अतिशय महत्त्वाच्या विचारांचा लाभ आपण सर्वांनी घ्यावा असे मत व्यक्त केले.

आपल्या बीजभाषणात लोकतत्त्वीय समीक्षेबद्धल विवेचन करताना डॉ. साहेब खंदारे म्हणाले की, 'लोकतत्त्वीय समीक्षा पद्धती ही एक मूलभूत अशी समीक्षा पद्धती असून कोणत्याही कलेच्या आकलनासाठी आणि आस्वादासाठी या समीक्षेशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नाही'. असे प्रतिपादन करून डॉ. साहेब खंदारे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सर्वच कलाकृतींसाठी लोकतत्त्वीय समीक्षा पद्धती कशी महत्त्वाची आहे हे स्पष्ट केले. लोकतत्वे म्हणजे काय? समीक्षेतील लोक, या लोकांची संस्कृती, या संस्कृतीतून जन्माला आलेली सांस्कृतिक मूल्ये, त्याचा जीवनाशी असलेला संबंध आणि जीवन प्रवाहाच्या मुशीतून तयार होणारे साहित्य, विविध कला याचा एक भव्य पटल डॉ. खंदारे यांनी उलगडून दाखवला आणि पुढे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या तृतीयरत्न, पोवाडा छत्रपती शिवाजी महाराज, पोवाडा विद्या खात्यातील ब्राह्मणपंतोजीचा, गुलामगिरी, अखंड, शेतकऱ्याचा आसूड अशा सर्वच ग्रंथांवर विवेचन करून या कलाकृतींच्या अभ्यासासाठी, समीक्षेसाठी लोकतत्त्वीय अंगाने विचार करताना तो कसा करावा लागेल यावर अतिशय मर्मग्राही असे विवेचन केले. प्रमुख पाहुणे डॉ.नारायण कांबळे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, महात्मा फुले यांच्या साहित्यावर मंथन होणे ही काळाची गरज आहे. काळाची पाऊले ओळखून या महाविद्यालयाने ही कार्यशाळा आयोजित केली. महात्मा फुले यांचे विचारच आजच्या समाजाला तारक आहेत असे मत व्यक्त केले.

उद्घाटनाच्या सत्रानंतर पुढे दोन सत्र संपन्न झाली. यातील एका सत्रांचे वैशिष्ट्ये म्हणजे फार मोठ्या प्रमाणात उपस्थित असलेल्या सहभागी अभ्यासकांचे प्रश्न- उत्तराचे सत्र.डॉ. साहेब खंदारे हे नव्यानेच, नव्या समीक्षेची मांडणी करीत असल्यामुळे त्यांना विविध अभ्यासकांनी वेगवेगळ्या अंगाने वेगवेगळे प्रश्न विचारले आणि तेवढीच समर्पक अशी उत्तरे डॉ. साहेब खंदारे यांनी दिली. या परिषदेसाठी प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कठारे, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे यांच्यासह जवळपास ११० अभ्यासकांनी आपला सहभाग नोंदविला होता.

या कार्यशाळेतील एका सत्रांमध्ये डॉ. सुरेश शिंदे, डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. क्रांती मोरे, डॉ. अशोक नारनवरे, डॉ. गोविंद काळे, डॉ. अहिल्या अंजनडोहगावकर हे साधनव्यक्ती आणि डॉ.दीपक चिद्दरवार, डॉ. म.ई.तंगावार, डॉ.जयद्रथ जाधव,डॉ. दत्ता करंजकर आदी मान्यवर अभ्यासक उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक मराठी विभागाचे डॉ. अंकुशकुमार चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.राजकुमार मोरे यांनी केले तर डॉ. सुभाष कदम यांनी आभार मानले.या कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, अभ्यासक संशोधक विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मराठी विभागातील सर्व सहकारी प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

# जुने वाहन स्वेच्छेने मोडीत काढल्यास नव्यासाठी १५ टक्के कर सवलत



**मुंबई-**स्वेच्छेने वाहन मोडीत (स्क्रॅप) काढणाऱ्या वाहनधारकांना पुन्हा त्याचप्रकारचे नवीन वाहन खरेदी करताना १५ टक्के कर सवलत देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नोंदणीकृत वाहन निष्कासन केंद्रावर (आरव्हीएसएफ) परिवहन प्रकारातील वाहनांना नोंदणीपासून ८ वर्षांच्या आत वाहन स्वेच्छेने मोडीत काढल्यास तसेच परिवहनेतर प्रकारातील वाहनांना नोंदणी पासून १५ वर्षांच्या आत स्वेच्छेने वाहन मोडीत काढल्यास १० टक्क्यांची कर सवलत दिली जात होत होती.

यापुढे एकरकमी कर लागू असणाऱ्या परिवहन (ट्रान्सपोर्ट) तसेच परिवहनेतर वाहनांना कराच्या १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. तर ज्या वाहनांना वार्षिक कर लागू आहे अशा परिवहन प्रकारातील वाहनाच्या नोंदणी दिनांकापासून पुढील ८ वर्षांपर्यंत तर परिवहनेतर प्रकारातील वाहनांसाठी पुढील १५ वर्षांपर्यंत वार्षिक करात १५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. नोंदणीकृत केंद्रावर (आरव्हीएसएफ) वाहन मोडीत (स्क्रॅप केल्यानंतर ) काढल्यानंतर वाहन धारकास मिळालेले ठेव प्रमाणपत्र (उशीींळषळलरींश ेष ऊर्शीीळीं) कर सवलतीसाठी पुढील दोन वर्षे वैध राहणार आहे. यात ज्या प्रकारचे म्हणजेच दुचाकी, तीन चाकी किंवा हलके मोटार वाहन मोडीत काढलेले असेल, त्याच प्रकारचे वाहन खरेदीनंतर नोंदणी करताना ही कर सवलत लागू होणार आहे. याबाबतची अधिसूचना जाहीर झाल्यापासून तीन वर्षांच्या आत असे वाहन स्वेच्छेने मोडीत (स्क्रॅप) काढल्यास ही कर सवलत मिळणार आहे.

## थोडक्यात...

### भीमजयंती मंडळाच्या अध्यक्षपदी सिद्धार्थ तामगाडगे

**माहूर (प्रतिनिधी)** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सार्वजनिक उत्सव समिती २०२५ ची कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे.या समितीच्या अध्यक्ष पदी सिद्धार्थ ताम गाडगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या सार्वजनिक भीम जयंती समितीची कार्यकारिणी पुढील प्रमाणे : उपाध्यक्ष रणधीर पाटील, आदर्श लांडगे, सचिव विक्रांत भगत, दत्ता कांबळे, सहसचिव देवानंद लांडगे, शंकर कांबळे,कोषाध्यक्ष रेणुकादास वानखेडे, प्रकाश मुनेश्वर, सतीश कांबळे, गजानन मोरे, प्रतीक कांबळे, प्रसिद्धी प्रमुख विनोद कांबळे, संदेश कायटे, तर प्रकाशक केशव भगत यांचा समावेश आहे.



### सिग्नलिंग ब्लॉकमुळे तांदूर एक्स्प्रेस अंशतः रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)**– येरमरस – रायचूर मारिचेथल या स्थानकांवर स्वयंचलित ब्लॉक सिग्नलिंगचे कामामूळे नॉन-इंटरलॉकिंगचे काम करण्यात येणार आहे. त्या मुळे काही रेल्वे गाड्यांच्या परीचालनावर परिणाम झाला आहे. गाडी क्रं.१७६६४ नांदेड-रायचूर एक्स्प्रेस ०५ एप्रिल रोजी अंशतः रद्द करण्यात आली आहे. ४ मार्च २०२५ रोजी हुजूर साहिब नांदेड येथून सुटणारी गाडी संख्या १७६६४ हुजूर साहिब नांदेड रायचूर एक्स्प्रेस ही गाडी तांदूर रायचूर दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. दि. ५ मार्च रोजी रायचूर येथून सुटणारी गाडी क्रं. १७६६३ रायचूर -परभणी एक्स्प्रेस ही गाडी रायचूर - तांदूर दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांचा मुदखेड तालुक्यात दौरा

## पंचायत समितीसह बारड, नागेली व डोंगरगावला भेट



**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी बुधवारी मुदखेड तालुक्यातील बारड, नागेली व डोंगरगाव येथे दौरा करून ग्रामस्थाशी संवाद साधला. बारड येथे त्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच घरकुल बांधकामाला गती देण्याच्या सूचना केल्या.

यावेळी जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर विहीर तसेच ४ लाख २० हजार लिटर क्षमतेच्या जलकुंभाची पाहणी केली. सध्या जुन्या योजनेतून पाणीपुरवठा होत असून, नव्याने सुरू झालेल्या योजनेव्दारे पाणीपुरवठा करण्याच्या सूचनाही मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली त्यांनी दिल्या.

ग्रामस्तरावर ओला व सुका कचरा विलगीकरणासाठी सेग्रीगेशन शेड उभारण्याचे तसेच गावातील स्वच्छता व्यवस्थापनासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्याचे निर्देशही मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिल्या.

गावात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मोहिमा राबवाव्यात, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी बारडच्या सरपंच मंगल बुरडे, उपसरपंच बाळासाहेब देशमुख बारडकर, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता आर. डी. रावसाहेब, उप कार्यकारी अभियंता वाडीकर, वेरूळकर, ग्राम पंचायत अधिकारी अनुप श्रीवास्तव, कंत्राटदार काझी, दिगंबर टिप्परसे, भगवान पुयड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शुभम तेलेवार उपस्थित होते.

**सीईओंची पंचायत समितीला आकस्मिक भेट**

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी मुदखेड पंचायत समितीला अचानक भेट देऊन तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती व कामकाजाचा आढावा घेतला. प्रधानमंत्री आवास योजना तसेच अन्य योजनांच्या अंमलबजावणीची पाहणी करत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी गटविकास अधिकारी एस. एच. बळदे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक २८ वर्षानंतर नफ्यात

## कर्मचारी भरतीही लवकरच करण्यात येणार -अध्यक्ष खतगावकर

**नांदेड (प्रतिनिधी)** – नवीन आर्थिक वर्ष नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसाठी आनंदाचे ठरले आहे. मागील २८ वर्षापासून बँकेला लागलेल्या संचित तोट्याच्या कलंकातून मार्च २५ अखेर बँक तोटामुक्त झाली असून बँक नफ्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हा बँकेच्या मुख्य कार्यालयात बुधवार दि. दोन एप्रिल रोजी दुपारी माजी खासदार खतगावकर पत्रकारांशी बोलत होते. सन २००० पासून बँकेचा ताळेबंद बिघडलेला होता. त्यामुळे भारतीय रिझर्व बँकेने २० ऑक्टोबर २००५ रोजी बँकिंग नियमन कायदा १९४९ चे कलम ३५ (अ) प्रमाणे निर्बंध लागू केले होते. तसेच राज्याच्या सहकार खात्याने बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक व नंतर प्रशासकीय मंडळ नेमले होते. सन २००७ अखेर बँकेच्या संचित तोटा उच्चांकी म्हणजे ३७० कोटीत कर्ज (एनपीए) ५६३ कोटी अशी बँकेची बिकट आर्थिक स्थिती होती. बँकेच्या कठीण काळात तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख व पालकमंत्री अशोकराव चव्हाण यांनी बँकेला मोठा दिलासा दिला होता. महाराष्ट्र शासनाकडून ११० कोटी रुपये कर्ज रुपये देऊन अशोकराव चव्हाण यांनी त्याला अनुदानामध्ये रूपांतरित केले होते. बँकेवर प्रशासक मंडळांनी अनावश्यक खर्चाला लगाम लावला.

सन २०१५ पासून बँकेचा कारभार पुनश्च लोकनियुक्त लोकप्रतिनिधींच्या हाती आला. तेव्हापासून मागील दहा वर्षातील पाठपुराव्यानंतर अशोकराव चव्हाण यांच्या सहकार्यामुळे शासन थकहमीपोटी राज्य शासनाकडून २५ कोटी मिळाले. कलंबर सहकारी साखर कारखाना विक्रीतून २२ कोटी मिळाले. संस्थेकडे अनिष्ट तफावत दोन कोटी वसूल झाले व कायदेशीर मार्गाने व तडतडीतून विविध संस्थांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज वसुलीची रक्कम बँकेला प्राप्त झाली. त्यामुळे बँक ३१ मार्च २०२५ अखेर संचित तोट्यातून मुक्त होऊन नफ्यामध्ये आली असल्याचे त्यांनी सांगितले.

१९९७ पासून असलेल्या संचित तोटा जो की सन २००७ अखेर मध्ये ३७० कोटी होता तो कमी होत तब्बल २८ वर्षानंतर बँक संचित तोट्यातून मुक्त होऊन मार्च २५ अखेर निव्वळ नफ्यामध्ये आलेली आहे. तसेच सन १९९७ पासून असलेला एनपीए जो की सन २००७ मध्ये सर्वात जास्त ५६३ कोटी होता म्हणजे एकूण कर्जाचे ८८% होता. तो कमी होऊन १३० कोटी आतमध्ये एकूण कर्जाच्या प्रमाणात १५% आज झालेला आहे.

बँकेच्या ६३ शाखापैकी ५९ शाखा नफ्यामध्ये आलेल्या असून चार शाखा अल्पशा तोट्यामध्ये आहेत. त्यात गोळेगाव ता. उमरी, मांडवी ता. किनवट, शिराढोण ता. कंधार आणि लिंबगाव ता. नांदेड या शाखांचा समावेश आहे. तसेच राज्य शासनाकडून बँकेस मिळणारे व्याज अनुदानाची २.५० टक्के रक्कम बँकेस मिळवून देण्यासाठी भरतीसाठी राज्य शासनाचे परवानगीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, बँकेचे ज्येष्ठ संचालक आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांचे सहकार्य लाभले. ज्यामुळे मार्च २०२५ अखेर बँकेचे आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झाली असल्याचे यावेळी खतगावकर म्हणाले.

आज घडीला बँकेत ८८९ कोटी रुपये खातेदारांचे डिपॉझिट आहेत. २२ कोटी रुपये नुकतेच अजित पवार यांनी मंजूर केले असून बँक भरती मंजुरी दिली आहे. सध्या १७० कर्मचाऱ्यावर बँकेच्या गाडा चालतो असे खतगावकर यांनी सांगितले. जिल्ह्यातील जवळपास २२ हजार शेतकऱ्यांकडे आज घडीला शंभर कोटी रुपये थकबाकी असल्याचेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला बँकेचे सरव्यवस्थापक कदम यांची उपस्थिती होती.

# राजकीय मान्यवरांच्या काव्यवाचनाने रंगली मैफिल

**नांदेड (प्रतिनिधी)** – राजकीय मंडळीचे व्यासपीठ म्हटलं की, एकमेकांबदलची राजकीय टीकाटिप्पणी, वैचारिक मतभिन्नता येवढेच अपेक्षित असते. मात्र विविध राजकीय पक्षांचे मान्यवर एकाच मंचावर येवून अप्रतिम काव्यवाचन करून मैफिल रंगवू शकतात. याचा प्रत्यय सोमवारी (ता.३१) बुद्धिजीवी प्रेक्षकांना अनुभवता आला. निमित्त होते मराठी अपडेटच्या वतीने आयोजित अभिजात मराठी उत्सव, राजकीय मान्यवरांचे काव्यवाचन हया कार्यक्रमाचे. दरम्यान यावेळी विविध विषयांवर भाष्य करणाऱ्या कवितेचे वाचन राजकीय मंडळींकडून साहित्य रसिकांना ऐकता आले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे पहिले मराठी नववर्ष असल्याचे औचित्य साधून, मराठी अपडेटचे संस्थापक तथा काँग्रेस जिल्हाप्रवक्ते बापूसाहेब पाटील यांनी अभिजात मराठी उत्सव, राजकीय मान्यवरांचे काव्यवाचन सोमवारी (ता.३१) मिनी सह्याद्री सभागृहात आयोजित केला होता.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते माजी राज्यमंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर, वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारूख अहमद, काँग्रेसचे प्रा. यशपाल भिंगे, भाजपा जिल्हा प्रवक्ते संतोष पांडागळे, काँग्रेस प्रदेश सचिव सुरेंद्र घोडजकर, कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल पावडे आदींच्या अप्रतिम काव्यवाचनाने साहित्य रसिक मंत्रमुग्ध झाले.

यावेळी माजी उपमहापौर आनंद चव्हाण, संजय पाटील शेळगावकर आदी उपस्थित होते. दरम्यान राजकीय क्षेत्रातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष बंटी लांडगे आणि सहकार क्षेत्रातून मराठवाडा अर्बनचे अध्यक्ष उमेश पावडे यांना युथ आयकॉन सन्मानाने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन राज्य गीताने करण्यात आले. आयोजक तथा काँग्रेस जिल्हाप्रवक्ते बापूसाहेब पाटील यांनी प्रास्ताविक केले. ऋषीकेश कोंढेकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी शेख कलीम, दिंगाबर शिंदे, गोविंद पाटील, धनंजय उमरीकर यांनी परिश्रम घेतले.

# 'एमजीएम' अभियांत्रिकी महाविद्यालयाचा रस्ते सुरक्षा कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग

**नांदेड (प्रतिनिधी)** – एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. २९ मार्च रोजी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरात विविध ठिकाणी पथनाट्य, पोस्टर्स प्रेझेंटेशन, पदयात्रा काढून रस्ते सुरक्षेबद्दल सामाजिक जागरुकता निर्माण करण्यात आली.

भारतात दरवर्षी रस्ते अपघातात हजारो नागरिक मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या आहे. हे मृत्यु रस्ता सुरक्षेबद्दलचे नियम न पाळल्यामुळे होतात. असे होऊ नये म्हणून दरवर्षीच भारतात राष्ट्रीय सुरक्षा पंधरवाडा - सप्ताह जानेवारी- फेब्रुवारी महिन्यात साजरा करण्यात येतो.



या वर्षी दि. २९ मार्च रोजी नुकताच 'एमजीएम'च्या विद्यार्थ्यांकडून नांदेड शहरात आयटीआय चौक, अण्णाभाऊ साठे चौक, एसपी ऑफिस चौक आदी ठिकाणी पथनाट्य सादर करून रस्ते सुरक्षेबद्दल लोकांना विविध संदेश देण्यात आला. रस्ते सुरक्षेबद्दल नियमांचे महत्व पटवून देण्यात आले.

या कार्यसाठी एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी कार्तिक व्यवहारे, पल्लवी जोगदंड, ओंकार तेलंगे,ज्ञानेश्वर कावळे, स्नेहल राठोड , जान्हवी रेणेवाड, सुषमा पाटील खुशी शितळे, नम्रता पांचाळ आणि आदिती शिंदे यांनी पुढाकार घेतला.

महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकीचे प्रा.अनिकेत भोरे, सोमनाथ टेकाळे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले आणि विद्यार्थांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या सामाजिक कार्याबद्दल संस्थाध्यक्ष कमलकिशोर कदम महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर, उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे, विभाग प्रमुख डॉ. महेश हरकरे, डॉ. अर्चना राजूरकर, डॉ. हाश्मी एस.ए, डॉ.कल्पना जोंधळे, डॉ. अर्शद हाशमी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# सांगवी येथील श्री आसनेश्वर महादेव मंदिरात आज शिवलिंगाची स्थापना

**नांदेड (प्रतिनिधी)**– भाजपचे दत्ता पाटील कोकाटे यांच्या पुढाकारातून सांगवी बु. आसना बायपास येथे श्री आसनेश्वर महादेव मंदिरात दि. ३ रोजी शिवलिंग स्थापना व कलशारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २ एप्रिलपासून सुरू झालेल्या या कार्यक्रमाची सांगता ३ एप्रिल रोजी होणार आहे. सकाळी सात वाजता नर्मदेश्वर महादेव मूर्ती स्थापित देवता पूजन, हवन आणि मूर्ती स्थापना सकाळी दहा वाजून ३५ मिनिटाला त्यानंतर कलशारोहण अकरा वाजता तर पूर्णाहूती सकाळी साडेअकरा वाजता होणार आहे. यानंतर दुपारी एक वाजल्यापासून महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. सर्व विधी श्री वेदशास्त्री स. खंडूगुरू असोलेकर महाराज आणि श्री महंत मृत्युंजय भारती महाराज यांच्या हस्ते संपन्न होणार आहेत. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भुजंगराव पाटील कोकाटे, शिवाजीराव पाटील कोकाटे, अर्जुनराव पाटील कोकाटे, गंगाधरराव पाटील कोकाटे, माजी नगरसेविका नागाबाई कोकाटे, भाजपचे दत्ता पाटील कोकाटे आणि अंकुश पाटील कोकाटे, राम, शाम, अनिरुद्ध आणि सांगवी (बु.) गावकरी मंडळीच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे निदर्शने




**नांदेड ( प्रतिनिधी )**– बुधवार दि.२ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा रेल्वे स्टेशनसमोर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने दुपारी १ वाजता निदर्शने करण्यात आली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास १४ एप्रिल पूर्वी सोनेरी रंग देण्यात यावा. पुतळा परिसरातील अतिक्रमण हटवून तेथे विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व संशोधन केंद्र स्थापन करावे. पुतळा परिसरातील खासगी व शासकीय जागा महापालिकेने ताब्यात घेऊन भव्य व ऐतिहासिक स्मारक उभारण्यात यावे, आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या आहेत.

रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. राजू सोनसळे यांनी याच मागण्यांसाठी सुरु केलेल्या आमरण उपोषणाला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. या निदर्शने आंदोलनात माकप नांदेड तालुका सचिव कॉ. गंगाधर गायकवाड, तालुका कमिटी सभासद कॉ. लता गायकवाड, कॉ. जयराज गायकवाड युनिट सभासद कॉ. मंगेश वाट्टेवाड, कॉ.सूरज सरोदे, कॉ. सोनाजी कांबळे, भाकप (माले) चे कॉ. दिगंबर घायाळे, कॉ. विलास असले आदींनी सहभाग घेतला होता.

मागण्यांची पूर्तता न झाल्यास मनपा आणि जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा कॉ. गंगाधर गायकवाड यांनी दिला आहे, अशी माहिती माकप नांदेड तालुका कमिटीच्या वतीने कळविण्यात आली आहे.

# निजामोदीन शेख चुडीवाले यांचे निधन

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – तालुक्यातील नरसी येथील ज्येष्ठ नागरिक निजामोदीन जैनोदीन शेख चुडीवाले (वय ७२) यांचे दि.२ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातू असा परिवार आहे. रियाज शेख चुडीवाले व रायगड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक ईरफान शेख यांचे वडील होत.



# सिडकोमधील श्री राम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव, शिवपुराण कथा उत्साहात



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको येथील श्री राम मंदिर संस्थान रामनगर यांच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव सोहळा निमित्त ३० मार्चपासून शिवपुराण कथा चालू आहे. दि. ७ एप्रिल रोजी या कथेचा समारोप होणार असून भाविकांचा या सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

सिडको रामनगर येथिल राम मंदिरात दररोज श्री रामाचा जपनाम अभिषेक सुशिल गुरू कुलकर्णी आरती व नित्यपाठ, ह भ प भागवताचार्य पंडित श्री विश्वास शास्त्री घोडजकर यांच्या सुमधुर वाणीतूम शिवपुरान कथेचे वाचन होत आहे. यावेळी यजमान म्हणून आनंद बासटवार हे तर दि. ६ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ श्री रामकृष्ण जामकर यांचे रामजन्म कीर्तन, दुपारी १२ वाजता रामजन्म पाळणा, महाआरती, सायंकाळी ६ वाजता शोभायात्रा काढण्यात येणार आहे. दि. ७ रोजी सकाळी १० वाजता श्री विमलेश्वर वारकरी शिक्षण संस्था मरळकचे संस्थापक शिवाजी महाराज इंगळे यांच्या संकल्पनेतून यांच्या भक्तिसंगम आयोजन, महाआरती व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिवपुराण कथेला जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री राम मंदिर संस्थान विश्वस्त मंडळ रामनगर सिडकोच्या वतीने करण्यात आले आहे.

# चाणक्य इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**मुखेड (प्रतिनिधी)**– मुखेड येथिल चाणक्य इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नहेसंमेलन उत्साहात पार पडले. चिमुकल्यांनी विविध कलांचे सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. पी. देशमुख, प्रमुख अतिथी न्यायाधीश के. एम. मुंढे, डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज, जी. टी. इलेक्ट्रोड, स्त्रीरोग तज्ञ डॉ. खंडागे यांची उपस्थिती होती.

अ‍ॅड. जोगदंड यांनी सूत्रसंचालन तर संचालिका सौ. अनुराधा हिवराल यांनी प्रास्ताविक केले.


त्यानंतर विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला. यावेळी गणेश जुन्ने, पार्थ वडजे, स्वराज वडजे, श्लोक मंडले, गिरगावकर आविष्कारक, रुदा ईसा मसीह, अफानशेख, बाबळे विराट, नलावद सिद्धेश्वर, आरग कांबळे, सोनाली राठौड़, अविष्कार राठौड़, स्वरा साखरे, सिद्धि कमलवद, स्वाति साखरे, शादुल चौहान, साईचरण शिंदे, सुधाकर, स्वराजली गायकवाड, सोलोवाड वैष्णवी, ओंकार इलेक्ट्रोड, शिंदे श्रुति, कृष्णा शिंदे, मंडले समृद्धी, वाडीकर कार्तिक, अक्कमवाड यश, हिवराळे गुरुग, मंडेवाड साई, बड़ेवाड रुद्र, वल्लेपवाड श्रीनिवास, अकुलवाड वैष्णवी, कृष्णा शिंदे, पाटील अधिपति, वल्लापवाड साहेबराव, चव्हाण खुशी, चव्हाण कार्तिक, देवांश इंगोले, बोइनवाड वैष्णवी, वाकोद विराज, तमालवाड विनायक, सांगवी सोनकांबळे, महेश्वरी शिंदे, ईश्वरी शिंदे, जुन्ना सांची, चव्हाण क्रांति, जगदे माही, राउखेडे ऐश्वर्या, चोंडे सोनाली, प्रतीक प्यारे, सानवी दिनकर, सर्वज्ञ कदम, अलीशा पठान, माधव मामीलवाड, अनन्या कागने, रिजवान शेख, अंवतिका गिरगावकर, वेदिकाल्ला बिळे यांनी कला सादर केल्या. कार्यक्रमासाठी शिक्षिका शिवपूजे, शिंदे, सचिन चाणक्य जुने, शेळके, रानी मेदवाड, दिनकर, सलमा शेख यांनी परिश्रम घेतले.

# राज्यातील खासगी अकादमीच्या सक्षमीकरण व आर्थिक सहाय्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** – मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या अ‍ॅथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, लॉनटेनिस, रोइंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफटींग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारांच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करणाऱ्या खासगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अशा संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. त्यानुसार इच्छुक संस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, नांदेड येथे संपर्क साधावा व सदरचा अर्ज दि. १५ एप्रिलपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील खेळाडूंसाठी अध्यावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, क्रीडा वेधकशास्त्र, क्रीडा स्पर्धाचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरीता करीअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी, विदेशी प्रशिक्षक व संस्थाचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने 'मिशन लक्ष्यवेध' या महत्वकांक्षी योजनेची अमलबजावणी राज्यामध्ये करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खासगी अकादमींना आर्थिक सहाय्य करावयाच्या दृष्टीने संबंधित अकादमी मधील खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभुत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरिंचे गुणांकन करण्यात येऊन, ३५ ते ५० गुण प्राप्त करणाऱ्या संस्था क वर्ग, ५१ ते ७५ गुण प्राप्त करणा-या संस्था ब वर्ग व ७६ ते १०० गुण प्राप्त करणाऱ्या संस्था अ वर्ग अश्या प्रकारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. क वर्ग अकादमींना वार्षिक १० लक्ष रुपये, ब वर्ग अकादमींना वार्षिक २० लक्ष व अ वर्ग अकादमीना वार्षिक ३० लक्ष रुपये आर्थिक सहाय्य, पायाभुत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ. बाबींवर खर्च करण्यासाठी देण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातील इच्छुकांनी या योजनेचा जास्तीत-जास्त खेळाडूंनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

चौंथे पुण्यस्मरण
निमित्त
विनम्र अभिवादन
स्व.घोटू सिताराम भानावत
अभिवादनकर्ते :
रविंद्र घोटू भानावत (मुलगा)
सचिव : लोकहित शिक्षण संस्था, सहयोग नगर, नांदेड
प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, मुदखेड ता. मुदखेड
अध्यक्ष : अखिल भारतीय बंजारा महासंघ, म.रा. नवी दिल्ली
व समस्त भानावत परिवार तसेच संस्थेचे सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

## हेल्दी ड्रिंकिंग हॅबिट

सकाळच्या वेळी तुम्ही तुमच्या दिवसाची सुरुवात एका हेल्दी आणि रिफ्रेशिंग ड्रिंक सह करावी. ज्याममुळे तुमची बॉडी आणि ब्रेन दोन्ही रिचार्ज राहतील. सोबतच तुमच्या स्किनला फ्रेश ग्लो देऊ शकतील. चला तर जाणून घेऊया की कोणत्या प्रकारचे ड्रिंक तुम्ही तयार करायला पाहिजे. एक ग्लास पाणी घेऊन गरम करा. आता या पाण्यामध्ये ३ चमचे साखर आणि 1/4 चमचे मीठ टाका. जेव्हा पाणी उकळू लागेल तेव्हा गॅस बंद करा आणि कॉफी मग मध्ये गाळून घ्या. आता हे पाणी घोट घोटभर चहा सारखे प्या. तुम्हाला आवडत असल्यास तुम्ही टोस्ट वा कुकीज सोबत सुद्धा हे ड्रिंक पिऊ शकता.

## एलोवेरा जेल आईस क्यूब

सकाळच्या वेळेस चेहरा धुतल्याशिवाय डोळे उघडताच सर्वात आधी आपल्या हातांनी चेहऱ्याला मसाज करा. असे करणे खूप लाभदायी असते कारण रात्री तुमच्या स्कीन द्वारा निर्माण केले गेलेले नैसर्गिक तेल त्वचेवर येते. यामुळे स्कीन सेल्सचा मसाज केल्याने चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते. यानंतर एलोवेरा जेलने तयार केलेल्या आईस क्यूबने चेहऱ्यावर ४ ते ५ मिनिटे मसाज करा. हे क्युब्स तुम्ही अगदी सहजपणे तयार करू शकता. २ चमचे एलोवेरा जेल घ्या आणि २ चमचे गुलाबजल घ्या. दोन्ही गोष्टी मिक्स करून आईस ट्रे मध्ये रात्रीच्या वेळी जमा होण्यासाठी ठेवून द्या. जेणेकरून सकाळी उठल्या उठल्या तुम्ही त्यांचा वापर करू शकाल.

## ५ सोप्या पद्धतीने कमी करा त्वचेवरील टॅन

**त्वचेची काळजी घेण्यासाठी आपण अनेक उत्पादने वापरतो. पण त्वचेची काळजी घेताना काही छोट्या चुका करतो. या क्षुल्लक वाटणाऱ्या चुकांचा परिणाम त्वचेवर खोल होतो. म्हणूनच तुम्ही त्वचेची काळजी घेणं गरजेचं असते. तुम्ही देखील या समस्येला सामोरे जात असाल तर तुमच्या या प्रश्नाचे उत्तर तुमच्या स्वयंपाक घरात आहे. काही गोष्टींचा वापर करून तुम्ही तजेलदार त्वचा पुन्हा मिळवू शकता. यामुळे तुमच्या त्वचेला कोणतेही नुकसान होणार नाही. चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या गोष्टी...**



- पपई : पपई तुमच्या त्वचेचा पोत चांगला ठेवण्यास मदत करते. पपईप्रमाणेच टोमॅटो, टरबूज, बटाटा आणि काकडी पपई हे एक्सफोलिएटिंग गुणधर्मांनी समृद्ध आहे. हे एक अतिशय चांगले नैसर्गिक ब्लीचिंग एजंट देखील आहे. त्यामुळे तुमची त्वचा स्वच्छ होण्यास मदत होते.
- बटाट्याचा रस : बटाट्याचा रस फक्त ब्लीचिंग एजंट नसून डोळ्यांभोवतीची काळी वर्तुळे कमी करतो. बटाट्याप्रमाणेच टोमॅटोमध्येही अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात. त्यामुळे त्वचा उजळण्यास मदत होते.
- काकडी : काकडी ही थंड असल्याने त्याचा वापर त्वचेचा पोत सुधारण्यास होते. त्यामुळे टॅन काढून टाकण्यास मदत करते. काकाडीसोबतच तुम्ही पिकलेली पपई, टरबूज, बटाटे, टोमॅटोचा वापर करू शकता. यासाठी तुम्ही काकडीचे ४-५ तुकडे घ्या. मिक्स करून जेलीसारखी पेस्ट बनवा. पेस्ट १५ मिनिटे रेफ्रिजरेट करा. आता ही पेस्ट त्वचेवर लावा यामुळे तुमचे त्वचा तेजस्वी होण्यास मदत होईल.
- मसूर, हळद आणि दूध : मसूर डाळीमुळे चेहऱ्यावरील केस काढण्यास मदत होते. यासाठी तुम्ही मसूर डाळ कच्च्या दुधात रात्रभर भिजत ठेवा. भिजवलेली मसूर हळद घालून बारीक करून पेस्ट बनवा. त्वचेवर लावा आणि कोरडे होईपर्यंत सोडा. नंतर हलक्या हाताने धुवा. या पेस्टमुळे तुमची चेहऱ्याचा रंग तर उजळेल पण चेहऱ्याला नवा नूर देखील येईल.

### लिंबाचा रस आणि मध

लिंबाचा रस एक नैसर्गिक ब्लीचिंग एजंट आहे. जो सन टॅन काढून टाकण्यास मदत करतो. यासाठी ताज्या लिंबाचा रस घ्या आणि त्यात एक चमचा मध घाला. मृत पेशी काढून टाकण्यासाठी आपण थोडी साखर देखील घालू शकता आणि हळूवारपणे आपली त्वचा स्क्रब करू शकता. २०- ३० मिनिटे कोरडे करा आणि स्वच्छ धुवा.



# प्रखर उन्हामुळे स्किन करपटली ?

**उन्हाळ्यात उन्हाच्या तीव्रतेमुळे त्वचेवर काळसरपणा येतो, ज्याला आपण सन टॅन म्हणतो. अनेक वेळा सनस्क्रीन वापरूनही त्वचेवर काळे डाग किंवा टॅनिंग दिसून येते. बाजारात उपलब्ध असलेल्या रासायनिक उपायांपेक्षा घरगुती आणि नैसर्गिक उपाय जास्त प्रभावी ठरतात. हे उपाय त्वचेची निगा राखण्यास मदत करतात आणि कोणतेही दुष्परिणाम न होता टॅनिंग दूर करतात. चला, मग जाणून घेऊया काही सोपे आणि नैसर्गिक घरगुती उपाय, जे तुमच्या त्वचेला पूर्वीप्रमाणे उजळ आणि सुंदर बनवतील.**

- लिंबाचा रस अन् मध : लिंबामध्ये नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असतात, जे त्वचेवरील टॅन दूर करण्यास मदत करतात. मध त्वचेला मॉइश्चरायझ करतो आणि चमकदार बनवतो. लिंबाचा रस आणि मध समप्रमाणात मिसळून त्वचेवर लावा. १५-२० मिनिटांनी कोमट पाण्याने धुवा. आठवड्यातून दोन वेळा हा उपाय केल्यास त्वचा स्वच्छ आणि उजळ दिसेल.
- दही आणि बेसनचा स्क्रब : दहीमध्ये लॅक्टिक ॲसिड असते, जे त्वचेतील मृत पेशी काढून टाकण्यास मदत करते, तर बेसन त्वचेला उजळ बनवते. दोन चमचे दही आणि एक चमचा बेसन मिसळून पेस्ट तयार करा. ही पेस्ट चेहरा आणि हातांवर लावा आणि हलक्या हाताने मसाज करा. १५ मिनिटांनी पाण्याने धुवा. हा उपाय आठवड्यातून तीन वेळा करा.
- एलोवेरा आणि गुलाबपाणी : एलोवेरामध्ये त्वचेला थंडावा देण्याचे गुणधर्म आहेत, तर गुलाबपाणी त्वचेला ताजेतवाने बनवते. ताज्या एलोवेराच्या गरामध्ये दोन चमचे गुलाबपाणी मिसळा आणि रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर लावा. सकाळी थंड पाण्याने धुवा. यामुळे त्वचेवरील टॅन कमी होईल आणि त्वचा मृदू आणि तजेलदार दिसेल.
- टोमॅटो आणि दुधाचा पॅक : टोमॅटोमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स असतात, जे टॅन दूर करण्यात मदत करतात, तर दूध त्वचेला पोषण देते. टोमॅटोचा रस आणि कच्चे दूध समप्रमाणात मिसळा आणि टॅन झालेल्या भागावर लावा. २० मिनिटांनी धुवा. यामुळे त्वचेचा रंग सुधारेल आणि टॅनिंग लवकर कमी होईल.
- बटाट्याचा रस : बटाट्यामध्ये नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असतात, जे टॅनिंग दूर करण्यास मदत करतात. बटाट्याचा रस काढून त्वचेवर लावा आणि १५-२० मिनिटे ठेवा. त्यानंतर कोमट पाण्याने धुवा. हा उपाय नियमित केल्यास त्वचा उजळ आणि टॅन फ्री दिसेल.

**त्वचेवरील टॅन दूर काढण्यासाठी घरगुती उपाय अत्यंत प्रभावी आणि सुरक्षित असतात. लिंबाचा रस, दही-बेसन, आलोवेरा, टोमॅटो आणि बटाटा हे घटक त्वचेसाठी फायदेशीर असून, कोणत्याही दुष्परिणामांशिवाय टॅनिंग दूर करतात. हे उपाय नियमित केल्यास त्वचा उजळ, मृदू आणि निरोगी दिसेल. त्यामुळे या नैसर्गिक उपायांचा जरूर लाभ घ्या आणि तुमच्या त्वचेला चमकदार बनवा.**

## चेहरा करा डिटॉक्स

**आपली त्वचा अत्यंत नाजूक असते. त्यामुळे ती दिवसातून दोनदा स्वच्छ करणे अधिक महत्त्वाचे आहे. या सर्वांमध्ये मेकअप आणि चेहऱ्यावरील घाण काढून टाकणे खूप महत्त्वाचे आहे. नितळ त्वचा कोणाला नाही आवडत ? त्यासाठी आपण सर्वच खूप मेहनत घेतो. पण कामाच्या गडबडीमध्ये आपण त्वचेकडे जास्त लक्ष देऊ शकत नाही. पण तुमच्या काही सवयींमध्ये बदल करून तुम्ही काचेसारखी नितळ त्वाचा मिळवू शकता. चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या सवयी...**

- मास्क लावा : नियमित मास्क लावल्याने तुमची त्वचा नेहमी स्वच्छ राहते आणि ती ताजी ठेवण्यास मदत होते. आठवड्यातून एकदा फेस मास्क लावू शकता. यामुळे तुमच्या मृतपेशी सुधारण्यास मदत होईल. त्याच प्रमाणे तुमच्या त्वचेला पुरेसा ओलावा देखील मिळेल.
- लिंबूपाणी प्या : लिंबू पाणी प्यायल्याने तुमच्या त्वचेला चमक येईल. लिंबूपाणी सुपर हायड्रेटिंग आहे. त्यामुळे तुम्हाला ताजेतवाने वाटू शकते. रोज सकाळी उठल्यावर लिंबू पाणी प्यायल्याने तुमची त्वचा स्वच्छ तर होईलच पण वजन कमी होण्यासही मदत होईल. या पाण्यात साखरेचा वापर टाळा.
- फेस स्क्रब : घाम येणे, घाण साचणे आणि दिनचर्येतील बदल यामुळे छिद्रे अडकू शकतात. एक चांगला फेस स्क्रब ही छिद्र साफ करण्यास मदत करू शकतो. यामुळे तुम्हाला मुरुम आणि सुरकुत्यापासून सुटका मिळेल.
- फेशियल : शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी भरपूर पाणी पिण्याची गरज असते. त्याचप्रमाणे तुमच्या त्वचेलाही कोरड्या आणि निर्जीव त्वचेला सामोरे जाण्यासाठी हायड्रेशनची गरज आहे. हायड्रेक्योर फेशियल तुम्ही करू शकता.

## फक्त दोन मिनिटं अन् काळवंडल्या चेहऱ्याला द्या नवी चमक...!



बदललेल्या जीवनशैलीचा परिणाम थेट त्वचेवर होत असतो. अशातच प्रखर उन्हामुळे चेहरा काळवंडतो. सध्या कोणत्याही काळात सन टॅन ही समस्या निर्माण होते. प्रखर सूर्यप्रकाशामुळे त्वचा काळी पडते. त्वचेवर काळे डाग पडू लागतात. चेहऱ्याची त्वचा संवेदनशील असल्यामुळे कधीकधी वेदना देखील होतात. या काळात तुम्हाला त्वचेची जास्त काळजी घ्यावी लागते. घरात असणाऱ्या काही गोष्टींपासून तुम्ही त्वचेवर येणारे डी-टॅन काढू शकता. या मास्कमुळे तुमच्या त्वचेचा रंग उजळण्यास मदत होईल. सन टॅन कमी होण्यासाठी १० दिवस तरी नक्की लागतात आणि ते पूर्णपणे काढून टाकण्यासाठी एक महिन्याचा काळ लागतो. पण सन टॅन होऊच नये म्हणून आपण आधीपासूनच काळजी घेणं गरजेचं असतं. यासाठी त्वचेवर सनस्क्रीन लावणे फायद्याचे ठरते. पण एवढे करूनदेखील तुम्हाला सन टॅन झाले असेल तर हे दोन उपाय नक्की वापरून पाहा.

### संत्र्याची साल आणि दुधाने बनवलेला फेस मास्क

संत्र्याच्या सालीमध्ये हेस्पेरिडिन नावाचे रसायन असते, जे मेलेनिनचे उत्पादन कमी करण्यास मदत करू शकते. त्यात अँटिऑक्सिडंट्सची चांगली मात्रा असते, ज्यामुळे सन टॅनमुळे झालेल नुकसान भरून काढण्यात येते. त्वचेचे संरक्षण करण्यास मदत होते. हे त्वचेला टवटवीत करण्याचे काम करते आणि त्वचा स्वच्छ करते.

#### फेस मास्क बनवण्याची कृती

१ संत्र्याची साल, २ टीस्पून दूध, १ टीस्पून गुलाब पाणी, संत्र्याची साल सोलून ग्राइंडरमध्ये बारीक करून घ्या. आता एका भांड्यात काढा, त्यात दूध आणि गुलाबपाणी घालून चांगले मिक्स करा. प्रथम आपला चेहरा स्वच्छ करा आणि नंतर हा मास्क चेहरा आणि मानेवर लावा. यानंतर १० मिनिटे राहू द्या आणि ठरलेल्या वेळी चेहरा धुवा. हा मास्क तुम्ही आठवड्यातून एकदा वापरून पाहू शकता.

### मुलतानी माती आणि कोरफड जेल फेस मास्क

मुलतानी माती आणि कोरफड त्वचा उजळण्यास मदत करतात. त्याच प्रमाणे त्वचेचे झालेले नुकसान भरून काढण्यास मदत होते. या फेस मास्कच्या मदतीने तुमच्या त्वचेतून ॲक्सेस ऑइल आणि मृत पेशी काढून टाकण्यास मदत होते आणि त्वचेचा रंग उजळण्यास मदत होते.

#### फेस मास्क बनवण्याची कृती


साहित्य : २ चमचे कोरफड जेल, १ टीस्पून मुलतानी माती, कोरफड जेल आणि मुलतानी माती एकत्र करून त्याची पेस्ट तयार करा. ही पेस्ट चेहऱ्याला लावून चेहऱ्याला १५ मिनिटे राहू द्या. त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा. हा मास्क तुम्ही आठवड्यातून एकदा लावू शकता.

**मास्कचा फायदा : डी टॅन मास्कमुळे तुमच्या त्वचेतील मृत पेशी, ॲक्सेस ऑइल काढण्यास मदत होते. त्याचप्रमाणे तुमच्या त्वचेला पोषणतत्वांची गरज असते. या फेस मास्कमुळे तुमच्या त्वचेला हवे असणारे सर्व पोषणत्त्व मिळतात.**

## घरच्या घरी करा सॉफ्ट हेयर वॅक्स

**महिला शरीरावर नको असलेले केस काढण्यासाठी अनेक उपाय करतात. त्यासाठी हजारो रुपये खर्च करतात. पण जर तुम्हाला हे पैसे वाचवायचे असतील तर तुम्ही घरच्या घरी काही उपाय करून हे केस काढू शकता. त्यात सॉफ्ट हेयर वॅक्स हा प्रकार वापरून तुम्ही पैसे वाचवू शकता. घरच्या घरी सॉफ्ट वॅक्स सहज बनवू शकता. सॉफ्ट हेयर वॅक्समुळे त्वचेमध्ये मुलायम आणि आर्द्रतायुक्त राहते. या पद्धतीमध्ये शरीरावरील केस सहजपणे निघतात. वॅक्सिंगची क्रिम शरीराला लावल्यानंतर त्यावर स्ट्रिप ठेवल्यास अनेकदा स्ट्रिपसोबत केस निघत नाहीत. यामुळे आपल्याला त्रास तर सहन करावा लागतोच, शिवाय वेळही अधिक लागतो. अशा स्थितीत सॉफ्ट हेयर वॅक्स हा उत्तम पर्याय असू शकतो.**

- आश्चर्यकारक फायदे : सॉफ्ट वॅक्सचा प्रभाव केसांसोबत त्वचेवरही पडतो. म्हणून, हात, पाय यांसारख्या मोठ्या भागांवरील केस काढण्यासाठी सॉफ्ट हेयर वॅक्सचा वापर केला जातो. या वॅक्सिंगचा त्वचेला खूप फायदा होतो.
- सॉफ्ट वॅक्सिंग का करावे ? : हात, पाय, कंबर यासारख्या मोठ्या भागावरील नको असलेले केस काढणे खूपच सोपे आहे. सॉफ्ट वॅक्सिंग खूप स्वस्तात मिळते. सॉफ्ट वॅक्सिंग मधूनच तुटत नाही. तुम्ही कोमट सॉफ्ट वॅक्सिंगदेखील वापरू शकता. सॉफ्ट वॅक्सिंगमुळे ग्लोइंग स्किनही यासोबत मिळते. सॉफ्ट वॅक्सिंगमुळे त्वचेतील मृत पेशी काढून टाकण्यासही मदत होते. शेव्हिंगच्या तुलनेत वॅक्सिंगमुळे केसांची वाढ कमी होते.



### घरी सॉफ्ट वॅक्सिंग कसे बनवायचे ?

घरी घरी सॉफ्ट वॅक्सिंग बनवण्यासाठी पुढील साहित्य वापरा. पांढरी दाणेदार साखर १ कप, १ टी स्पून लिंबाचा रस, पाव कप मध, १ टी स्पून पाणी. कृती : सर्व प्रथम एका भांड्यात साखर आणि पाणी घालून मंद आचेवर ठेवा. साखर वितळल्यानंतर त्यात लिंबाचा रस आणि मधही टाका. मधेच मिश्रण ढवळत राहा म्हणजे ते जळणार नाही. मिश्रण थोडे घट्ट होऊ लागले की गॅस बंद करा. आता तुमचे सॉफ्ट वॅक्स हेअर रिमूव्हल वॅक्सिंगसाठी तयार आहे. हलक्या हाताने हे मिश्रण तुम्ही त्वचेवर टाकून हातावरील केस काढू शकता.

### ही घ्या खबरदारी...

हार्ड वॅक्सिंगपेक्षा सॉफ्ट वॅक्सिंग जरा जास्त वेदनादायक असू शकते. तुमचे केस सोडले असले तरी, त्याच ठिकाणी पुन्हा सॉफ्ट वॅक्सिंग लावू नका. सॉफ्ट वॅक्सचा जास्त वापर केल्यास त्वचेचे नुकसान होऊ शकते.

## तर तुमच्या नखाची सर कोणाला नाही...


**आपण आपल्या संपूर्ण शरीराची काळजी घेतो. पण नखांची हवी तशी काळजी घेत नाही. चेहरा, केस आणि शरीराच्या सौंदर्याव्यतिरिक्त, नखांचे सौंदर्य देखील खूप महत्वाचे आहे. आपण अन्न हाताने खातो त्यामुळे आपल्या नखांची काळजी घेणं हे महत्वाचे असते. यासाठी वेळोवेळी नखे कापणे, ती पॉलिश करणे, नेल पेंट लावणे आणि त्यांना चांगला आकार देणे या गोष्टी खूप महत्त्वाच्या मानल्या जातात. पण नखांची काळजी घेताना काही गोष्टी लक्षात ठेवणं गरजेचं असते. या गोष्टी जर आपण लक्षात ठेवल्या नाहीत तर नखं खराब होण्याची जास्त भीती असते. पण बाहेरील गोष्टींपेक्षा आहार, मॉइश्चरायझर या गोष्टी देखील तेवढ्याच महत्त्वाच्या मनल्या जातात. चला तर मग जाणून घेऊयात आपण नखांची कशा प्रकारे काळजी घेऊ शकतो...**

### नखे कापल्यानंतर अशी घ्या काळजी

- नखे कापल्यानंतर त्यांची काळजी घेणं महत्त्वाचे असते. त्यामध्ये नखे कापल्यानंतर तुम्ही त्यांना मॉइश्चराइज लावू शकता किंवा खोबरेल तेल देखील वापरू शकता. जर तुम्ही असे नाही केले तर नखं आणि नखांच्या जवळील त्वचा कोरडी आणि निर्जीव होऊ लागते.
- स्वस्त नेल पेंट लावणे : नखांचे सौंदर्य वाढवण्यासाठी स्त्रिया वेगवेगळ्या प्रकारचे नेलपॉलिश लावतात, परंतु काही वेळा पैसे वाचवण्यासाठी स्वस्त पेंटचा वापर केला जातो, यामुळे नखे ठिसूळ आणि पिवळी पडतात. त्यामुळे कमी दर्जाच्या नेलपेंटचा वापर करू नका. यामुळे नखं खराब होतात. त्याच प्रमाणे नेलपेंटचे अनेक थर देखील लावत जावू नका. यामुळे नेलपेंट निघून तुमच्या शरीरात जाण्याची शक्याता जास्त असते.
- संतुलित आहार घेणे : नखेच नाही तर संपूर्ण शरीर निरोगी ठेवण्याची पहिली अट म्हणजे संतुलित आहार घेणे, त्यात संतुलन बिघडले तर कुठेतरी त्रास सहन करावा लागू शकतो. पोषक तत्वांनी युक्त आहार घेतल्यास ठिसूळ नखांपासून सुटका होते, तसेच नखे मजबूत होतात. आरोग्यदायी पदार्थ न खाल्ल्यास नखांची चमक नष्ट होऊन ते कमकुवत होऊ लागतात. नखे मजबूत करण्यासाठी तुम्ही सलाड आणि भाज्यांचा सामावेश जेवणामध्ये करू शकतो.



### नखे वेगळ्या पद्धतीने कापणे



काही वेळा महिला आकर्षक बनवण्यासाठी नखे वेगवेगळ्या आकारात कापतात, परंतु असे केल्याने नखे कमकुवत होऊ लागतात आणि नंतर तुटतात, अशा स्थितीत नेहमी चंद्राच्या आकारात नखे कापणे फायद्याचे राहते. त्याच प्रमाणे रोजच्या कामाच्या गडबडीमध्ये नखे अर्धी तुटतात. त्यामुळे नखांची योग्य पद्धतीने काळजी घेण्यासाठी ती विशिष्ट आकारात कापा.

### मॉइश्चरायझर वापरा...

जेव्हा तुम्ही चेहऱ्याला मॉइश्चरायझर वापरता त्यावेळी नखांना देखील मॉइश्चरायझर वापरा. नखांच्या पोषणासाठी ही गोष्ट खूप महत्त्वाची मानली जाते. यामुळे नखे मजबूत होण्यास मदत होते. त्यामुळे तुमची नखे ठिसूळ होत नाहीत.

# ‘एआय’ सेंटर्स ऑफ एक्सलन्ससाठी महाराष्ट्र शासन व मायक्रोसॉफ्ट यांच्यात सामंजस्य करार



**मुंबई, (प्रतिनिधी)** – राज्यात बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि मायक्रोसॉफ्ट यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार झाला. करारावर महाराष्ट्र शासनांच्यावतीने मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि मायक्रोसॉफ्टचे वेंकट कृष्णन यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव नवीन सोना, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले तसेच मायक्रोसॉफ्टचे विक्रम काळे, विशाल घोष आदी यावेळी उपस्थित होते.

हा सामंजस्य करार महाराष्ट्र शासनाच्या ‘‘डिजिटल भारत, आत्मनिर्भर महाराष्ट्र‘‘ या संकल्पनेला बळकटी देणारा आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने शासन अधिक सक्षम, लोकाभिमुख आणि पारदर्शक होईल, ज्याचा थेट लाभ नागरिकांना मिळेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या की, मायक्रोसॉफ्टसोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे राज्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात प्रशिक्षण मिळविण्याची संधी मिळणार आहे. ही भागीदारी महाराष्ट्राच्या २०२८ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या स्वप्नाला गती देईल. तसेच महत्त्वाच्या पायाभूत सुविधा आणि प्रकल्पांना अधिक सक्षम करेल. याचबरोबर राज्याच्या नवकल्पना, प्रगती आणि उद्योजकतेला चालना मिळेल. यामुळे ही भागीदारी महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारी ठरेल.

## ‘आरबीआय’च्या डेप्युटी गर्व्हनरपदी पूनम गुप्ता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – माजी अर्थतज्ज्ञ पूनम गुप्ता यांची भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ७ ते ९ एप्रिल दरम्यान होणाऱ्या द्वैमासिक चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीपूर्वी ही नियुक्ती करण्यात आली. पुढच्या तीन वर्षांच्या कालावधीसाठी त्या या पदावर असणार आहेत. मायकल पात्रा सध्या या पदावर आहेत. पूनम गुप्ता सध्या नॅशनल कॉऊन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्चच्या महासंचालक म्हणून काम पाहतात. त्या पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्या आहेत आणि १६ व्या वित्त आयोगाच्या सल्लागार परिषदेच्या संयोजक म्हणून काम करतात.

## देगलूर नगरपरिषद देगलूर जि.नांदेड

फोन नंबर (०२४६२)२५७६२४ फॅक्स नंबर (०२४६२) २५५७७७

E-Mail.codegloor@gmail.com

जा.क्र.न.प.दे/विद्युत विभाग /३०/२०२५ दिनांक २/४/२०२५

### जाहीर ई निविदा सुचना

मुख्याधिकारी नगरपरिषद देगलूर जि.नांदेड यांनी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून आमदार स्थानिक निधी अंतर्गत १ काम ासाठी सिलबंद लिफाफ्यात स्पर्धात्मक ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३/४/२०२५ सकाळी ११.०० वाजेपासुन ते दिनांक ११/४/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहे.सविस्तर जाहिरात अटी व शर्ती इत्यादी माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.ई निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदा पैकी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगरपरिषद देगलूर यांनी राखून ठेवला आहे.

**मुख्याधिकारी / प्रशासक**
**नगरपरिषद, देगलूर**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## नगर परिषद बिलोली कार्यालय जि.नांदेड

### निविदा सुचना (दुसरी वेळ)

जा.क्र./बि.न.प/५ दिनांक २/४/२०२५

नगर परिषद बिलोली अंतर्गत विविध विभागासाठी आवश्यकतेनुसार कंत्राटी कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरवठा करणे या कामासाठी ई निविदा बिलोली नगर परिषदेकडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**(सतिश पुदाके)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद बिलोली**

## जाहीर प्रगटन

मौजे वाडी बु. ता.जि. नांदेड हद्दीतील सर्व्हे नंबर ७/बी प्लॉट नंबर ११असुन लांबी दक्षिण उत्तर ४२.६ इंच पश्चिम कडून ४१ फुट रूंदी पुर्व पश्चिम ३०फुट एकूण क्षे.१२५२.५ चौरस फुटाचा प्लॉट ज्योती सुनिल हंबर्डे रा.विष्णूपुरी नांदेड यांचेकडून सौ.सुशिला माधवराव कानगुले रा.देवंग्रा ता.चाकुर जि.लातूर यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची.चर्तु:सिमा:-पुर्वेस -१५फुट रूंद रोड, पश्चिमेस -प्लॉट नंबर १८, दक्षिणेस-सदरील सर्व्हे नंबर मधील मोकळी जागा, उत्तरेस -प्लॉट नंबर १२

तरी वरील चर्तुसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क,उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा.मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**मार्फत** **जाहीर प्रगटन देणार**
**अॅड.सावित्री जोशी** **सौ.सुशिला माधवराव कानगुले**
**गोकूळ निवास कलामंदीर सोमेश** **रा.देवंग्रा ता.चाकुर जि.लातुर**
**कॉलनी नांदेड मो.९४२१७६१८९८** **मो.९७६५९६७७५३**

## जाहीर प्रगटन

४ थे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ५४८/२०२५,बालाजी विरुध्द सिडको,
अर्जदार -बालाजी पि. दिगांबर तरटे, वय ५३ वर्षे, धंदा मजुरी, रा. एन. डी. ४२. पी-२, हडको, नविन नांदेड, जि. नांदेड,
विरुध्द
गैरअर्जदार - सिटी अॅड इंडस्ट्रीअल डेवलपमेंट कॉर्पोरेशन,
तर्फे प्रशासक, कार्यालय सिडको नांदेड,
प्रकरण - इंडीयन सक्सेशन अॅक्ट कलम २७८ नुसार मयताचे मिळकतीचे प्रशासकीय प्रमाणपत्र अर्जदारांच्या नावे मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात मयत राजामती भ्र. व्यंकटराव तरटे यांच्या इंडीयन सक्शेशन अॅक्ट कलम २७८ नुसार मयताचे मिळकतीचे प्रशासकीय प्रमाणपत्र अर्जदाराच्या नावे मिळण्यासाठी अर्ज केला आहे. अर्जदार हा मयताचा एकमेव वारस आहे. मयत राजामती प्र. व्यंकटराव तरटे हे दिनांक १३/०१/२०१० रोजी मरण पावले आहेत. मयत राजामती भ्र. व्यंकटराव तरटे यांची सिडको, नवीन नांदेड येथील मालमत्ता घर क्र. एनडी - १ / ७डब्ल्यू / ०३०३ संबंधीत मयताचे मिळकतीचे प्रशासकिय प्रमाणपत्र अर्जदारांच्या नावे मिळणेसाठी या न्यायालयात दिनांक २०/०३/२०२५ रोजी अर्ज दाखल केला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी वर नमुद अर्जदाराच्या नावे मयत राजामती प्र. व्यंकटराव तरटे यांची सिडको, नवीन नांदेड येथील मालमत्ता घर क्र. एनडी-१ / ७डब्ल्यू / ०३०३ संबंधीत मयताचे मिळकतीचे प्रशासकिय प्रमाणपत्र अर्जदाराच्या नावे देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दि. ०६/०५/२०२५ रोजी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.आज दिनांक २५ माहे मार्च, २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने दिला.

**आदेशावरून**
**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर**

## Change In Name

My Old Name is HENDRE SHITAL UMRAO which now I am changing as New Name HENDRE SHEETAL UMRAO Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same AD- NEW MONDHA BHARAT GAS GODAWAN JAVAL NANDED SHIVAJI NAGAR MAHARASHTRA 431602 MO.9793233442

## Change In Name

I, SHAIKH KARIM SHARFODDIN AT POST BABA RAMZAN GALLI , KINWAT TQ.KINWAT DIST NANDED MAHARASHTRA - 431804 HAVE CHANGED MY NEW NAME To SHAIKH KARIM SHAIKH SHARFODDIN FOR All FUTURE PURPOSES YOURS SHAIKH KARIM SHAIKH SHARFODDIN AT POST BABA RAMZAN GALLI KINWAT, TQ.KINWAT DIST NANDED MAHARASHTRA - 431804

## Change In Name

My 0ld name is- Rajaram Mahadu Danekar,Which now I am changing as new name -Danekar Rajaram Madhavrav hence fourth my oll conespondence oll be done as par my new name . please consider the some Adress- at- Dhanara kd.post ,karkheli TQ Dharmabad dist Nanded Mob - 9503182272

## Change In Name

My Old Name is Swaroop Subhash Suryawanshi which now I am changing as New Name Swaroop Subhashrao Suryawanshi Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same AD- 1-11-448, Dyneshwar Nagar, Chatrapati Chowk, Nanded, 431605.

## Change In Name

My Old Name is DINESH RAMKRISHNA KANDALKAR which now I am changing as New Name DINESH RAMKRISHNARAO KANDALKAR Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same AD- DINESH RAMKRISHNARAO KANDALKAR ITI COLONY NANDED

### नमुना ई -४ ( नियम१८पहा )

निवडणुक निर्णय अधिकारी :- श्रीमती एन वाय महाबळे पदनाम -सहकार अधिकारी श्रेणी -२ संलग्न सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर

सहकारी संस्थेचे नांव :- स्व. सैनानी भुजंगरावजी पाटील किन्हाळकर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या भोकर ता. भोकर जि. नांदेड .

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणुक नियम २०१४ च्या नियम १९ प्रमाणे अधिकाराचा वापर करुन आणी मा. राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण जिल्हा निवडणुक अधिकारी यांना जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्था सदस्याची सन २०२५ ते २०३० या कालावधीची निवडणुक घेणे करीता मी श्रीमती एन. वाय. महाबळे पदनाम -सहकार अधिकारी श्रेणी -२ संलग्न सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर व मा. तालुका सहकारी निवडणुक अधिकारी ,भोकर यांच्या मान्यतेने स्व. सैनानी भुजंगरावजी पाटील किन्हाळकर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या भोकर ता. भोकर जि. नांदेड . म्हणुन ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्याची निवड करण्यासाठी निवडणुकीच्या कार्याक्रमातील विविध टप्पे तयार करुन जाहीर करीत आहोत आणी या सोबत जोडलेल्या अनुसुचीच्या स्तंभ२ विनिदिष्ट केलेल्या मतदार सघांच्या किंवा मतदारसंघांच्या संबंधातील निवडणुक नियत करीत आहोत.

| | मतदार संघाचे नाव | | नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनोक ( ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा | नामनिर्देशन पत्राचे यादीचे प्रकाशन | नामनिर्देशन पत्राचा छाणनीचा दिनांक | विधीग्राहय नामनिर्देशन पत्रांची सुची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा दिनांक | उमेदवारानां निशानीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी दिनांक , वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषीत करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | सर्वसाधारण प्रतिनिधी | १० | दि. ४.०४.२०२५ ते ११.०४.२०२५ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजे पर्यत मा.सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर कार्यालयात मिळतील ( शासकीय सुटीचे दिवस वगळुन ) | दि. ४.०४.२०२५ ते ११.०४.२०२५ जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज सायंकाळी ४.०० वाजता मा. सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर ( शासकीय सुटीचे दिवस वगळुन ) | दि. १५.४. २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन छानणी संपेपर्यंत मा. सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर यांचे कार्यालयात | दि. १६.४. २०२५ दुपारी ४ वा. मा. सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर यांचे कार्यालयात नोटीस बोर्डावर | दि. १६.०४. २०२५ ते २.०५.२०२५ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजे पर्यंत मा. सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर यांचे कार्यालयात ( शासकीय सुटीचे दिवस वगळुन ) | दि. ०३.०५.२०२५ सकाळी ११.३० वाजता मा. सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर यांचे कार्यालयात | दि.०९/५/२०२५ सकाळी ०८.ते सांय.४ वाजेपर्यंत स्थळ :- वेळेवर प्रसिध्द करण्यात येईल | दि.०९/५/२०२५ मतदानानंतर लगेचच स्थळ : वेळेवर प्रसिध्द करण्यात येईल. | दि. दि.०९/५/२०२५ मतमोजणी संपल्यानंतर लगेच |
| २ | महिला प्रतिनिधी | २ | | | | | | | | | |
| ३ | अनुसुचित जाती जमाती | १ | | | | | | | | | |
| ४ | इतर मागासवर्गीय | १ | | | | | | | | | |
| ५ | वि.जा. / ज.भ.वि. जा. / ज . किंवा वि.मा. प्र. | १ | | | | | | | | | |
| | एकुण | १५ | | | | | | | | | |

टिप:- १ स्त्ंभ क्रं. ७ व ९ मध्ये विनिदिष्ट केलेली यादी संस्थेच्या नोटीस बोर्डावर व सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल २. मतदार यादी निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विकत मिळेल. ३. नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या यादीमधुन चिन्हे निवडावयाचे आहेत. ४. निवडुन चिन्हांचे वाटप स्त्ंभ ९ मधील तारखेस व ठिकाणी सकाळी ११.३० वाजता करण्यात येईल .५. नामनिर्देशन पत्राची छानणी केल्यांनंतर यादी प्रसिध्द , मतदान व मतमोजणी दिवस वगळुन निवडणुक कार्यक्रम शासकीय / सार्वजनीक सुटया खेरीज राहील. ६. निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देण्याचे अधिकारी निवडणुक निर्णय अधिकारी यांना राहतील. निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता :- सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर जि. नांदेड बिल्लालनगर , रेल्वेस्टेशनच्या समोर भोकर.

( एन.वाय.महाबळे )
निवडणुक निर्णय अधिकारी
स्वा. सैनानी भुजंगरावजी पाटील किन्हाळकर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पत संस्था भोकर

जा.क्र. कक्ष-१/ निवडणुक स्व.सेनानी भुजंगरावजी पाटील किन्हाळकर / निवडणुक कार्यक्रम मंजुर २०२५
कार्यालय सहायक निबंधक सहकारी संस्था ता. भोकर जि.नांदेड दिनांक :- ०१/०४/२०२५

(एन.पी.कडपेवाड)
तालुका सहकारी निवडणुक अधिकारी
तथा सहायक निबंधक सहकारी संस्था ता.भोकर

प्रति,
निवडणुक निर्णय अधिकारी ,
स्वा. सैनानी भुजंगरावजी पाटील किन्हाळकर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पत संस्था भोकर

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# सण, उत्सवाच्या काळात सामाजिक सलोखा कायम ठेवा

## शांतता समितीच्या बैठकीत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचे आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)** – विविध सामाजिक उपक्रम व धार्मिक उत्सवासाठी नांदेड शहर हे नावाजलेले आहे. सोबतच गेल्या काही वर्षात अन्य ठिकाणी काही घटना घडल्या तरी नांदेड शहराने आपला सामाजिक सलोखा कायम ठेवला आहे. एप्रिल महिन्यातील सर्व सण, उत्सवात पुन्हा एकदा सर्व समाज बांधवांनी नांदेडचा नावलौकिक कायम ठेवावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये श्री राम नवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महावीर जयंती, हनुमान जयंती, गुड फ्रायडे, ईस्टर संडे व विविध सण उत्सवाच्या अनुषंगाने बुधवारी (दि.२) जिल्हास्तरीय शांतता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्यासह महानगरपालिका पोलीस प्रशासन, महसूल प्रशासनासह विविध विभागाचे विभाग प्रमुख तसेच शांतता समितीचे सदस्य, विविध आयोजन समितीचे मान्यवर उपस्थित होते.

प्रामुख्याने सण उत्सवाच्या काळात महानगरपालिकेकडून स्वच्छता, दिवाबत्ती या संदर्भात पूर्तता व्हावी, रस्त्यांची डागडुजी करण्यात यावी, पाणीपुरवठा वेळेत व्हावा आदी मागण्या करण्यात आल्या.

जिल्हा पोलीस अधीक्षक आणि निवासी उपजिल्हाधिकारी यांनी शांतता समितीच्या बैठकीमध्ये मांडण्यात आलेल्या सर्व मागण्यांसंदर्भात सकारात्मक प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच यावेळी सामाजिक सलोखा कायम ठेवण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले.

# मुलींनी अभ्यासासोबत स्वसंरक्षणाकडेही लक्ष द्यावे –कुलगुरू डॉ.चासकर




**नांदेड (प्रतिनिधी)** – मुली ह्या मुलांपेक्षा अभ्यासामध्ये नेहमीच पुढे असतात. काळाची गरज बघता त्यांना स्वतःचे स्वसंरक्षणही करता आले पाहिजे, म्हणून मुलींनी अभ्यासासोबत स्वसंरक्षणावरही लक्ष द्यावे, असे मत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले.

विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाद्वारे आयोजित मुलींसाठी दि. २ एप्रिल रोजी आयोजित कराटे प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, प्रा.डॉ. भीमा केंगले कराटे प्रशिक्षक विक्रांत खेडकर यांची उपस्थिती होती.

क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने यांनी प्रास्ताविक केले. कु. प्राजक्ता पांचाळ यांनी सूत्रसंचालन तर कु. सोनल पाईकराव यांनी आभार मानले. या शिबिरासाठी क्रीडा विभागाचे वरीष्ठ लिपिक संजयसिंह ठाकुर, शिवाजी हंबर्डे, सुनील लुटे, परमजीत सिंग सिद्धू , रतनसिंग पुजारी, शारीरिक शिक्षण विभागाचे पारस यादव, कुलदीप राणा, विजय जाधव, संतोष घ्याडे, प्रकाश इबितवार हे परिश्रम घेत आहेत.

# विद्यापीठात 'प्रगत अण्विक जीवशास्त्र साधने' विषयावर सात दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील जैवशास्त्र संकुलामध्ये दि. १ ते ७ एप्रिल दरम्यान 'प्रगत अण्विक जीवशास्त्र साधने' या विषयावरील सात दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन दि. १ एप्रिल रोजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, आयोजक डॉ. वी. एम. सुरवसे, डॉ. एल.एच. कांबळे यांची उपस्थिती होती.

सदर कार्यशाळा भारत सरकारच्या पीएम–उषा व हाय–मिडीया या रसायन उत्पादक कंपनीच्या संयुक्त आर्थिक साहाय्याने आयोजित काण्यात आली आहे. हाय–मिडीया कंपनीचे तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. सुनिल कोकणे आणि मनोज बारसे हे सहभागींना प्रशिक्षण देणार आहेत.

अध्यक्षीय भाषणात प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी विद्यापीठात संशोधन संस्कृती वाढवून समाजास उपयोग व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. संशोधक विद्यार्थी तसेच संशोधकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असेही ते म्हणाले.

संकुलाचे संचालक डॉ. बी. एस. सुरवसे यांनी प्रास्ताविक केले. विविध वनस्पतींचा शास्त्रशुध्द अभ्यास तसेच या वनस्पतीचा मानवास होणारा उपयोग या करीता प्रगत अण्विक साधनांचा कसा वापर करता येतो व त्याकरीता काय करावे लागते हे अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितले. रूबीया शेख यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी डॉ. मिलींद गायकवाड, डॉ. उमेश धुलधज, डॉ. ईरशाद बेग, सय्यद शाजीम, समरिन पठाण, गोविंद सुर्यवंशी, विद्या सुकरे, प्राजक्ता चांडोळकर सौ. उषा कोडगीर, राजू शेरे, सय्यद खाजा, सुशिल खरवडकर, रामा पिंपळे आदी परिश्रम घेत आहेत.

# राज्य बँकेच्या सरव्यवस्थापकपदी सायली भोईर यांची नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्याच्या सहकार क्षेत्रातील शिखर संस्था म्हणून कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या सरव्यवस्थापक म्हणून सायली एस. भोईर यांनी दि.१ एप्रिल रोजी पदभार स्वीकारला.

महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव म्हणून १४ वर्षे आणि तत्पुर्वी नागरी बँकिंग क्षेत्र २१ वर्षे अधिकारी पदावर यशस्वीपणे कार्य केलेल्या श्रीमती भोईर यांनी एल.एल.बी., सी.ए. आय.आय.बी. आणि बँकिंग व अर्थ विषयात एम.बी.ए. केलेले आहे. फेडरेशनमध्ये कार्यरत असतांना त्यांनी राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग तसेच सहकार आयुक्त व निबंधक यांच्या कार्यालयाने स्थापित केलेल्या विविध समित्यांवर अनेकाविध जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

# एसबीआय बँकेच्यावतीने वैद्यकीय महाविद्यालयास ४० आसनी बस भेट



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाव्दिालय व रुग्णालयास भारतीय स्टेट बँकेकडून सामाजिक उत्तरदायित्व निधी अंतर्गत एक ४० आसन क्षमतेची बस देणगी स्वरुपात भेट देण्यात आली. सदर बस अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्याचा कार्यक्रम भारतीय स्टेट बँकेच्या शिवाजी नगर येथील प्रशासकीय कार्यालयात पार पडला.

या प्रसंगी उप महाप्रबंधक प्रियाकुमार सारीगाला, क्षेत्रीय प्रबंधक कालीदासू पक्काला, एसीबी शाखा प्रबंधक गंगाधर कौकटवार, मानव संसाधन प्रबंधक रजत कुमार, मुख्य प्रबंधक सत्येंद्र कुमार, उप प्रबंधक प्रदीप शहारे व इतर बँक अधिकारी, कर्मचारी तसेच तसेच अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख, प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. आय. एफ. इनामदार, सहयोगी प्राध्यापक डॉ. आर. डी. गाडेकर, प्रशासकीय अधिकारी खुशाल विश्वासराव, समाजसेवा अधीक्षक गजानन वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सारीगाला म्हणाले की, भारतीय स्टेट बँक नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असून या वैद्यकीय महाविद्यालयास उपलब्ध करून दिलेल्या बसचा रुग्ण आणि विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी वापर होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अधिष्ठाता डॉ. देशमुख म्हणाले की, विविध आरोग्य शिबिरे, क्षेत्र भेटी, अभ्यास दौरे इत्यादी शैक्षणिक व आरोग्य विषयक उपक्रमांसाठी बसची नितांत आवश्यकता होती. हा उपक्रम यशस्वीपणे पूर्णत्वास नेण्याकरिता समाजसेवा अधीक्षक गजानन वानखेडे, देवेंद्र जोग, अर्जुन राठोड, संतोष मुंगल यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. बी.आर.आंबेडकर फाऊंडेशनचे कृष्णाई पत्रकारिता पुरस्कार जाहीर; माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांना समता गौरव पुरस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त २३ वर्षापासून डॉ. बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने पत्रकारीता क्षेत्र तसेच राजकीय, सामाजिक, शिक्षण, सांस्कृतीक, साहित्य, आरोग्य या क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देवून सन्मानित केले जाते. या वर्षीच्या पुरस्काराची घोषणा फाऊंडेशनचे अध्यक्ष बापुराव गजभारे आणि सचिव आकाश गजभारे यांनी संयुक्तरित्या पत्रकार परिषदेत केली.

सन २०२४– २०२५ चे पुरस्कार घोषित करण्यात आले असून राजकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांना यावर्षीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. स्मृतीशेष कृष्णाबाई नागोराव गजभारे यांच्या स्मरणार्थ दिले जाणारे कृष्णाई पत्रकारीता पुरस्कार प्रदिप नागापुरकर, राम तरटे, हाफीज घडीवाला (ग्रामिण) यांना जाहीर करण्यात आले आहे. पुरस्काराचे स्वरुप २५ हजार रुपये, १० हजार रुपये, आणि ५ हजार रुपये व मानपत्र असे आहे.

नव्याने सुरु करण्यात आलेला स्मृतीशेष मनोज गजभारे प्रज्ञावंत विद्यार्थी पुरस्कार यावर्षी आपल्या जिद्दीच्या बळावर शास्त्रज्ञ होत असलेल्या शितल संतोष गोमसकर या विद्यार्थीनीस जाहीर करण्यात आला आहे. लवकरच एका भव्य कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पत्रकार परिषदेस फाऊंडेशनचे उपाध्यक्ष सतिश बनसोडे, पंढरीनाथ बोकारे, संघरत्न खंदारे, सतिश पांडवे, मोहन गर्दनमारे, साहेबराव सोनकांबळे, राजू पार्डीकर, इश्वरप्रसाद अग्रवाल, राजेंद्र शुक्ला आदी उपस्थित होते.

# इंजि. तानाजी हुस्सेकर यांची पीएम उषा गव्हर्नन्स बॉडीच्या सदस्यपदी नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)** – प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम उषा) अंतर्गत गव्हर्नन्स बॉडीच्या सदस्यपदी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील कार्यकारी अभियंता इंजि. तानाजी हुस्सेकर यांची तज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल इंजि. तानाजी हुस्सेकर यांचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, एसजीजीएसचे संचालक डॉ. मनेष कोकरे, रासेयो विभागाचे संचालक डॉ.मल्लिकार्जुन करजगी, असर्जनचे पोलीस पाटील खंडेराव बकाल यांच्यासह सर्वच क्षेत्रातील व्यक्तींनी अभिनंदन केले आहे.

धर्माबाद येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाला या योजनेंतर्गत पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या परिसरात विविध विकासकामे केली जाणार आहेत.

# बिलोली येथील सराईत गुन्हेगार शेख सुलेमान हद्दपार

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यासह बिलोली तालुक्यात सतत गुन्हे करून दहशत पसरविणाऱ्या शेख सुलेमान शेख अहेमद याला बिलोली पोलिसांच्या अहवालावरून उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशावरून हद्दपार करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत पोलीस स्टेशन बिलोली येथील गुन्हेगारांवर वारंवार प्रतिबंधक कार्यवाही करुन सुध्दा त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने नांदेड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेदारांकडून अशा गुन्हेगारांस कारागृहात स्थानबध्द तसेच हद्दपार करण्यासंबंधाने कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केले होते.

बिलोली तालुक्यातील परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी व कोणतीही अप्रिय घटना घडू नये म्हणून हद्दपार शेख सुलेमान शेख अहेमद (वय ५५ वर्ष रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड) याने निर्माण केलेली अवैध कृती यांना पायबंध घालण्यासाठी आवश्यक क्षेत्रावरुन शेख सुलेमान शेख अहेमद रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड यास हिंगोली, परभणी, नांदेड, लातुर या जिल्ह्यातुन १८ महिन्यांसाठी हद्दपार करण्याचे आदेश बिलोली उपविभागीय दंडाधिकारी क्रांती डोंबे यांनी पारीत केले आहे.

पोलीस ठाणे बिलोली यांचेकडून कलम ५६ (क) (ख) म.पो.का. अन्वये वरील इसमांस हद्दपार करण्यासंबंधाने प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यामध्ये कायदेशीर प्रक्रीया पूर्ण करुन उप विभागीय दंडाधिकारी बिलोली क्रांती डोंबे यांनी वर नमुद इसमास नांदेड व लातुर जिल्हयाचे हद्दीत जिल्हयाचे बाहेर १८ महिन्यांसाठी हद्दपार करण्याबाबतचा अंतिम आदेश पारीत केला आहे. हद्दपारचा प्रस्ताव बिलोलीचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पाठविला होता.


पोलीस स्टेशन बिलोली हद्दीतील धोकादायक व्यक्तींना स्थानबध्द करण्यासंबंधाने बिलोली पोलीस ठाण्याकडून सन २०२४–२०२५ या वर्षात एकुण १८ प्रस्ताव पाठविण्यात आले असून येणाऱ्या काळात उरलेले १७ हद्दपार प्रस्तावाबाबत आदेश येणाऱ्या काळात प्रस्तावित आहेत.

# कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश हेलोंडे पाटील यांचा नांदेड दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे आहे.

दि.२ एप्रिल रोजी कळमनुरी येथून सायंकाळी ७.३० वा. विश्रामगृह नांदेड येथे आगमन व मुक्काम. गुरुवार ३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.३० वा. लोहा येथे तहसिलदार लोहा यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट. सकाळी ११ वा. कंधार ता. जि. नांदेड येथे तहसिलदार कंधार यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट. दुपारी १२ वा. विश्राम भवन कंधार जि. नांदेड येथे आगमन व राखीव. दुपारी १२.४५ वा. कंधार येथून यवतमाळकडे प्रयाण करतील.

# साईकुमार सर्जे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– शारदा नगर येथील रहिवासी साईकुमार सर्जे (वय ४०) यांचे हृदयविकाराच्या आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार दि. ३ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता गोवर्धन घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात वडील अशोकराव सर्जे, आई, पत्नी, एक मुलगी व दोन बहिणी असा परिवार आहे. फुलेनगर भागातील रहिवासी दिलीपराव देशमुख तरोडेकर यांचे ते जावई होत.

# आठ दिवसांपासून यात्री निवासचे रोहित्र बंद

## गुरुद्वारा भाविकांना उच्चतम सुविधा देण्याची जगदीपसिंघ नंबरदार यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– सचखंड गुरुद्वारा दर्शनासाठी देश–विदेशातून येणाऱ्या भाविकांना यात्री निवासमध्ये राहण्याची सुविधा देण्यात येते. पण या यात्री निवासांना विद्युत पुरवठा करणारे महावितरणचे रोहित्र मागील आठ दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे भाविकांची होत असलेली गैरसोय दूर करून भाविकांना उच्चतम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जगदीपसिंघ नंबरदार यांनी प्रशासक डॉ. विजय सतबीरसिंघ यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

गुरुद्वारा दर्शनासाठी जगभरातून हजारो भाविक दर्शनासाठी येतात. सचखंड गुरुद्वारा बोर्डाकडून या भाविकांची यात्री निवास, भाई मनीसिंघ यात्री निवास व भाई दयासिंघ यात्री निवास येथे राहण्याची व्यवस्था करण्यात येते. या परिसरातील महावितरणचे रोहित्र मागील आठ दिवसापासून बंद असल्याने यात्री निवासाची सर्व वातानुकूलित यंत्रणा ठप्प झाली आहे. त्यामुळे भाविकांची पर्यायी यात्री निवासांमध्ये व्यवस्था केली जात आहे. अति महत्त्वाच्या भाविकांनी ॲडव्हान्स बुकिंग करून यात्री निवास आरक्षित केले जातात. परंतु त्यांना अपेक्षित सुविधा उपलब्ध होत नसल्याने अनेक भाविकांना हॉटेल व लॉजमध्ये मोठा आर्थिक भुर्दड सहन करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता बोर्डाकडून रणजीतसिंघ यात्री निवासाचे निर्माण कार्य सुरू केले. पण सदरील निर्माणाचे काम अत्यंत संथ गतीने होत आहे. त्याची गती वाढवावी. होल्ला मोहल्ला व डिसेंबर महिन्यातील भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढते. गुरविंदरसिंघ बावा परिवार मुंबई यांना शेकडो बुकिंग देण्यात येतात, त्या कमी कराव्या तसेच पंजाब भवन यात्री निवास व एनआरआय यात्री निवासावर आणखी तीन ते चार मजल्यांचे बांधकाम करून अत्याधुनिक सुविधायुक्त रूम उपलब्ध करून द्याव्यात, एक दिवसासाठी येणाऱ्या भाविकांना गुरुद्वारा परिसरातच टिन शेड उभारून व्यवस्था करावी तसेच गुरुद्वारा बोर्डातील भ्रष्ट कर्मचारी आणि अनेक वर्षांपासून एकाच विभागात असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करावी, अशी मागणी जगदीपसिंघ नंबरदार यांनी प्रशासक डॉ.विजय सतबीरसिंघ यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com